रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२३
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पेडांबे 'स्वप्नातील गाव' म्हणून सन्मानित/२

लांबलेल्या पावसाचा कडधान्य पिकाला फटका/५

पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मैत्रेय मोकलला सुवर्णपदक/८

## पीएम किसान सन्मान निधी पंतप्रधान मोदींच्या हस्ते वितरित



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २१वा हफ्ता बुधवारी (दि. १९) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना रब्बी हंगामात मदत होणार आहे. पीएम किसान सन्मान योजना शेतकऱ्यांना निश्चित वार्षिक उत्पन्न सहाय्य मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी सहा हजार रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. ही मदत दोन हजारांच्या तीन समान हप्त्यांमध्ये थेट डीबीटी माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केली जाते. महाराष्ट्रात या योजनेचा मोठा लाभार्थी वर्ग असून एकूण ९०,४१,२४१ पात्र शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे एक हजार ८०८ कोटी २५ लाखांची रक्कम जमा होणार आहे.

# पॅनलनंतर नगराध्यक्षही बिनविरोध!

### सोलापूरच्या अनगरमध्ये भाजपचे शत् प्रतिशत यश

**सोलापूर : प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा-वरवाडे नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपच्या नयनकुवर रावल यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर आता सोलापूरमध्येही भाजपची सरशी झाली आहे. अपक्ष उमेदवाराच्या माघारीनंतर भाजपच्या प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील यांची अनगर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

याआधी अनगर नगरपंचायतीमध्ये नगरसेवकपदाच्या सर्व १७ जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या. भाजप नेते, माजी आमदार यांनी हा





करिष्मा करून दाखवला होता, तर नगराध्यक्षपदासाठी तीन अर्ज आल्याने निवडणूक होणार होती. दरम्यान, नगराध्यपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्वला थिटे यांनी दाखल केलला अर्ज सूचकाची सही नसल्याने छाननीत बाद झाला, तर अपक्ष उमेदवार सरस्वती शिंदे यांनी बुधवारी (दि. १९) अर्ज मागे घेतला. त्यामुळे प्राजक्ता पाटील यांची नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. यानंतर त्यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

प्राजक्ता पाटील या माजी आमदार भाजप नेते राजन पाटील यांच्या धाकटी सून असून अजिंक्यराणा पाटील यांच्या पत्नी आहेत. गावात जो विकास झालाय त्यात भर घालण्याचा माझा प्रयत्न असेल, असे त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.

### परंपरा कायम

गेल्या ५० वर्षांपासून म्हणजेच जेव्हापासून अनगर ग्रामपंचायत होती, तेव्हापासून या ठिकाणी बिनविरोध निवडणूक होत होती. त्यामुळे अनगर नगरपंचायतीची ही पहिली निवडणूकसुद्धा बिनविरोध व्हावी, असे माजी आमदार राजन पाटील यांचे म्हणणे होते. अखेर सर्व घडामोडीअंती अनगरमधील बिनविरोध निवडणुकीची परंपरा कायम राहिल्याने येथे पुन्हा एकदा पाटील परिवाराचे वर्चस्व दिसून आले आहे.

### नगर परिषद निवडणूक

## रायगडात ७८१ उमेदवारी अर्ज वैध, तर १८२ अवैध

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या निवडणुकीत नगराध्यक्ष आणि नगरसेवकपदांसाठी ९६३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १८२ उमेदवारांचे अर्ज छाननीत अवैध व ७८१ अर्ज वैध ठरले आहेत. नगराध्यक्षपदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी १७, तर नगरसेवकपदासाठी प्राप्त अर्जांपैकी १६५ अवैध ठरले.

जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या १० नगर परिषदांमध्ये सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या सर्व नगरपालिकांमध्ये १० नगराध्यक्ष व २१७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. यासाठी १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. १७ नोव्हेंबर या अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत १० पालिकांमध्ये नगराध्यक्षपदासाठी ६३, तर नगरसेवकपदांसाठी ९०० उमेदवारी अर्ज आले होते. अर्जांची छाननी मंगळवारी (दि. १८) झाली. त्यात नगराध्यक्षपदासाठी प्राप्त झालेल्या ६३ अर्जांपैकी १७ अर्ज अवैध व ४६ वैध ठरले. नगरसेवकपदासाठी प्राप्त ९०० अर्जांपैकी १६५ अर्ज छाननीत अवैध व ७३५ वैध ठरले. शुक्रवारी (दि. २१) अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल.

### नगर परिषदनिहाय वैध, अवैध अर्ज

खोपोली : नगरसेवकपदासाठी प्राप्त अर्ज १८८, वैध १६९, अवैध १९, नगराध्यक्षपदासाठी प्राप्त अर्ज १०, वैध ८, अवैध २; अलिबाग : नगरसेवकपदासाठी प्राप्त अर्ज ७५, वैध ६४, अवैध ११, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ६, वैध ५, अवैध १; श्रीवर्धन : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ६८, वैध ६२, अवैध ६, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ५, वैध ४, अवैध १; मुरूड-जंजिरा : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ७४, वैध ६२, अवैध १२, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ५, वैध ४, अवैध १; रोहा : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ७८, वैध ६१, अवैध १७, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ३, वैध ३, अवैध ०; महाड : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ७४, वैध ५०, अवैध २४, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ८, वैध ५, अवैध ३; पेण : नगरसेवकपद प्राप्त अर्ज १०३, वैध ८७, अवैध १६, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ५, वैध ४, अवैध १; उरण : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ७८, वैध ५३, अवैध २५, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ९, वैध ५, अवैध ४; कर्जत : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ९२, वैध ५८, अवैध ३४, नगराध्यक्षपद प्राप्त अर्ज ८, वैध ५, अवैध ३; माथेरान : नगरसेवकपद प्राप्त अर्ज ७०, वैध ६९, अवैध १, नगराध्यक्षपदासाठी प्राप्त अर्ज ४, वैध ३, अवैध १.

# नगराध्यक्ष नयनकुवर रावल यांचा सत्कार





**धुळे : प्रतिनिधी**

दोंडाईचा-वरवाडे नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी नयनकुवर रावल यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर बुधवारी (दि. १९) मुंबईतील भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांचा सत्कार करण्यात आला. या निवडीनंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाला भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील, जयकुमार रावल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, अतुल सावे, संजय सावकारे, आकाश फुंडकर, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री माधुरी मिसळ, माजी मंत्री व आमदार सुरेश खाडे, संजय कुटे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, संभाजीराव निलंगेकर, निरंजन डावखरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मान्यवरांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष नयनकुवर रावल यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नगराध्यक्ष रावल यांचा स्वतंत्रपणे सत्कार केला.

राज्यात नगराध्यक्षपदासाठी झालेली ही पहिलीच बिनविरोध निवड ठरली आहे. त्यामुळे पक्षातील कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ नेत्यांपर्यंत उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे.

## गँगस्टर अनमोल बिश्नोईला अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी, पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार गँगस्टर अनमोल बिश्नोई याला राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बुधवारी (दि. १९) अटक केली.

सध्या तुरूंगात असलेल्या गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोलला अमेरिकेतून हद्दपार केल्यानंतर दिल्लीत अटकेची कारवाई करण्यात आली. अनमोल २०२२पासून फरार होता. त्याच्यावर देशभरात अनेक खटले प्रलंबित आहेत. गेल्या वर्षी अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणातही अनमोलचा हात असल्याचे सांगितले जात आहे. त्याला न्यायालयाने ११ दिवसांची एनआयए कोठडी सुनावली आहे.

## निवडक

### बिहारमध्ये एनडीए सरकारचा आज शपथविधी सोहळा

**पाटणा** : बिहारमधील भाजपप्रणित एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा गुरुवारी (दि. २०) पाटण्यात होणार आहे. त्यापूर्वी बुधवारी एनडीएची बैठक झाली, ज्यात नितीश कुमार यांना विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आले. म्हणजेच ते मुख्यमंत्री होणार यावर शिक्कामोर्तब झाले. भव्य शपथविधी सोहळ्यात ते दहाव्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि विजय सिंहा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

### आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून गोव्यात रंगणार

**पणजी** : भारताचा ५६वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फी गुरुवार (दि. १६) पासून गोव्यात पणजी येथे सुरू होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधल्या २४० चित्रपटांचा समावेश असेल. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. मडगाव येथील रवींद्र भवनात हा चित्रपट दाखवला जाईल. येत्या २८ तारखेपर्यंत हा महोत्सव रंगणार आहे.

## माजी सभापती दिलीप भोईर यांच्यासह २१ जणांना जामीन मंजूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती दिलीप भोईर यांच्यासह एकूण २१ जणांना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अलिबाग सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील संगणक प्रशिक्षण केंद्राच्या संचालिका रूपाली थळे, त्यांचे पती विजय थळे आणि त्यांच्या नातेवाईकांवर दिलीप भोईर व सहकाऱ्यांनी हल्ला केल्याचा आरोप होता. या प्रकरणी मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि पोलिसांनी २५ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले होते. या जुन्या खटल्याचा निकाल १३ वर्षांनंतर लागला. अलिबाग सत्र न्यायालयाने दिलीप भोईर यांच्यासह एकूण २१ जणांना दोषी ठरवले तसेच त्यांना सात वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली होती. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. भोईर समर्थकांना यामुळे धक्का बसला होता.

अलिबाग सत्र न्यायालयाच्या या शिक्षेविरोधात दिलीप भोईर यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. हायकोर्टाने या प्रकरणावर सुनावणी घेतल्यानंतर भोईर यांच्यासह २१ जणांना जामीन मंजूर केला आहे.

## पंतप्रधान मोदी जगातील सर्वात लोकप्रिय नेते

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभरात पहिल्या क्रमांकाचे नेते बनले आहेत. ताज्या ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग यादीत ते अव्वल स्थानावर आहेत. ही यादी ६ ते १२ नोव्हेंबरपर्यंत गोळा केलेल्या डेटावर आधारित आहे. दुसऱ्या क्रमांकावर जपानचे पंतप्रधान साने ताकाइ, तिसऱ्या स्थानी दक्षिण कोरियाचे ली जे-म्युंग आहेत, तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आठव्या क्रमांकावर आहेत.

# निवडणूक आयोगाला बदनाम करणाऱ्या राहुल गांधींचा निषेध

### देशातील २७२ मान्यवरांचे खुले पत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते राहुल गांधी सातत्याने निवडणूक आयोगावर टीका करत आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील २७२ दिग्गज व्यक्तींनी एक खुले पत्र प्रसिद्ध करून आयोगाला स्पष्ट पाठिंबा दर्शवला आहे. यात माजी न्यायाधीश, निवृत्त सनदी अधिकारी, राजदूत आणि माजी सैन्य अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या पत्रातून विरोधकांवर जाणीवपूर्वक आयोगाची विश्वासहार्यता धूसर करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या खुल्या पत्रात एकूण २७२ प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश असून १६ माजी न्यायाधीश, १२३ निवृत्त सनदी अधिकारी, १४ माजी राजदूत आणि १३३ माजी सैन्य अधिकारी आहेत. त्यांच्या मते, विनापुराव्याचे आरोप करून संविधानिक संस्थांना कमजोर करण्याचा एक राजकीय पद्धतशीर प्रयत्न सातत्याने केला जात आहे. भारतीय लोकशाही आज बाहेरील हल्ल्यांमुळे नव्हे, तर विषारी राजकीय वक्तव्यांमुळे मोठ्या आव्हानासमोर उभी असल्याचे यात म्हटले आहे.

२०१४च्या लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेसची निवडणुकीतील पराभवाची रेषा सातत्याने खाली उतरते आहे. विविध



प्रयत्नांनंतरही काँग्रेसला विजय मिळवता आलेला नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी वोटचोरीचा मुद्दा उपस्थित केला आणि निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांवर गंभीर आरोप केले. या आरोपांवर बुद्धीवंतांनी नाराजी व्यक्त केली आहे.

आयोगाने एसआरएची प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने राबवली आहे. कोर्टाच्या देखरेखीखाली सत्यापन, बनावट मतदार हटवणे आणि नवे पात्र मतदार समाविष्ट करण्याचे काम केले. अशा परिस्थितीत आयोगाला भाजपची बी-टीम म्हणणे हे तथ्यांवर नव्हे, तर राजकीय निराशेवर आधारित आरोप असल्याचे पत्रात म्हटले आहे. विरोधक जिंकल्यावर आयोगाचे कौतुक करतात आणि हरल्यावर आरोप करतात, हा सेलेक्टिव आक्रोश आणि राजकीय संधीवाद स्पष्ट दर्शवतो, अशी बोचरी टीकाही पत्रात केली आहे.

विरोधक निवडणूक आयोगाविरोधात पुरावे असण्याचा दावा करतात, परंतु आयोगाकडे कोणतीही औपचारिक तक्रार किंवा प्रतिज्ञापत्र दाखल करत नाहीत. यावरूनच हे आरोप निव्वळ राजकीय रणनीतीचा भाग असल्याचे स्पष्ट होते. या संदर्भात पत्रात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अलीकडील विधानांचा उल्लेख आहे, ज्यात त्यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केला होता. अशा प्रकारचे वक्तव्य अधिकाऱ्यांना दबावाखाली आणण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते, असेही पत्रात मान्यवरांनी नमूद केले आहे.

# तळोजात साकारणार उच्च दर्जाचे शैक्षणिक संकुल

### पनवेल मनपाची निर्मिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात वाढती लोकसंख्या आणि शैक्षणिक गरज लक्षात घेता तळोजा नोड परिसरात विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक आणि उच्च दर्जाचे शैक्षणिक संकुल उभारले जाणार आहे. प्लॉट क्र. ६, सेक्टर ७, तळोजा गाव येथे हा नवा शैक्षणिक प्रकल्प साकारला जाणार आहे.

भविष्यातील आव्हानांचा विचार करून अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त अशी शाळा साकारण्यात येणार आहे. या इमारतीमध्ये आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये बेसमेंट + ग्राउंड + सहा मजले असून विद्यार्थ्यांना आरामदायी, आकर्षक आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी शाळेमध्ये एकूण ३५ वर्गखोल्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या शैक्षणिक संकुलात अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा आणि संशोधन कौशल्ये, डिजिटल साक्षरता व शैक्षणिक प्रगती वाढवण्यासाठी सुसज्ज ग्रंथालय उभारले जाणार आहे. विविध शालेय कार्यक्रम, सांस्कृतिक उपक्रम, इनडोअर खेळ, सभा आणि सामुदायिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मोठे व बहुउद्देशीय सभागृहही उभारले जाणार आहे.

याशिवाय या शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यात येणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित आणि कार्यक्षम वाहतुकीसाठी स्वतंत्र बस पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## बस अपघातात बालकाचा मृत्यू, पाच जण जखमी

**सिन्नर : प्रतिनिधी**

नाशिकच्या सिन्नर बसस्थानकात विचित्र अपघातात नऊ वर्षीय बालकाचा मृत्यू, तर चार ते पाच जण जखमी झाले आहेत. सिन्नर आगारातून बस ही स्थानकात आली असताना ब्रेक न लागल्याने ती थेट फलाटावर चढली. घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

मृत आदर्श बोराडे हा कुटुंबियांसमवेत देवदर्शनासाठी गेला होता. देवदर्शन करून सिन्नरहून आपल्या गावी जाण्याआधीच काळाने घाला घातला. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सिन्नर पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

## सदिच्छा भेट अन् आशीर्वाद




**पनवेल : खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ११मधील महायुतीचे उमेदवार विक्रम साबळे आणि सानिया शेख यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन्ही उमेदवारांना शुभेच्छा दिल्या तसेच प्रचारपत्रकाचे प्रकाशन केले.**

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून पीडितांना न्यायाची हमी -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

ब्रिटिशकालीन फौजदारी कायद्यांमध्ये डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील पुरावे गृहीत धरण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे पुरावे नष्ट करून आरोपी सुटत होते. परिणामी, विविध गुन्ह्यांमधील पीडितांना न्यायासाठी बराच कालावधी लागत असे. आता मात्र केंद्र शासनाने लागू केलेल्या नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे पीडितांना विशिष्ट कालावधीत न्यायाची हमी मिळत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आझाद मैदानावर नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित पाच दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतावर राज्य करण्यासाठी भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता



आणि भारतीय पुरावा कायदा ब्रिटिशांनी तयार केला होता. पीडितांना जलद गतीने न्याय मिळवून देण्याची व्यवस्था या कायद्यांमध्ये नव्हती. मात्र ही व्यवस्था या नवीन कायद्यांच्या निर्मितीने बदलून आरोपींना कठोर शासन आणि पीडितांना न्याय देणारी ठरत आहे. लोकशाहीत निवडून आलेले सरकार हे जनतेचे 'ट्रस्टी' असते. त्यानुसार या कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन कायदे हे शिक्षेपेक्षा न्यायावर जास्त भर देणारे आहे.

२०१३ मध्ये राज्याचा गुन्हे सिद्धता दर नऊ टक्के होता, तो आता ५३ टक्क्यांवर आला आहे. या नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारे हा दर निश्चितच ९० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकता. शासनाने १४ शासन निर्णयाद्वारे पोलीस दलात विविध सुधारणा केल्या आहेत. पोलीस दलाचे नियुक्ती नियम आणि नवीन आकृतीबंध करण्यात आला आहे. नवीन आव्हानांना सज्ज असणारे पोलीस दल निर्माण करण्यात येत आहे. मागील काही वर्षात ५० हजार पेक्षा जास्त पदभरती करण्यात आली आहे. आपले पोलीस दल देशात क्रमांक एकचे आहे, ते आता जगातही अव्वल करण्यावर भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सायबर गुन्हेगारीचे नवीन आव्हान आहे. राज्यात देशातील सर्वात चांगली सायबर लॅब आहे. मागील काही दिवसात सायबर बुलिंगपासून ६० पेक्षा जास्त मुलींना वाचविण्यात यश आले आहे. न्याय सहाय्यक मोबाईल व्हॅन्सच्या माध्यमातून पुराव्यांचे पारदर्शकरित्या पडताळणी करण्यात येत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे न्याय सहाय्यक प्रयोगशाळांकडे असलेल्या नमुन्यांची 'पेंडन्सी' कमी होत आहे. नवीन फौजदारी कायद्यांमध्ये कुठल्याही पोलीस स्टेशनअंतर्गत गुन्हा नोंद करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हा करून दुसऱ्या राज्यांमध्ये पळून जाणारा गुन्हेगार आता सुटू शकणार नाही. ई-एफआयआर नोंदविण्याची सुविधाही नागरिकांसाठी उपलब्ध आहे.

या प्रदर्शनात गुन्हा नोंदविण्यापासून ते आरोपींना शिक्षा होईपर्यंत प्रात्यक्षिकांच्या स्वरूपात माहिती देण्यात आली आहे. अशा पद्धतीची प्रदर्शने महसूल विभागांच्या ठिकाणी त्यानंतर जिल्हास्तरावर आयोजित करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

काळानुरूप नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पुरावे सुरक्षित ठेवून गुन्हेगारांना कारागृहापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था या नवीन फौजदारी कायद्यांनी निर्माण केली आहे. नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून समाजामध्ये असलेल्या विकृत मानसिकतेला कठोर शिक्षा करण्याची ताकद निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

# मुरूड शहरातील मतदान केंद्रांची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

**मुरुड : प्रतिनिधी**



मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता २ डिसेंबर निवडणूक तर ३ डिसेंबर ला मतमोजणी होणार असून यांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी – किसन जावळे व पोलीस अधीक्षक –आंचल दलाल यांनी मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात भेट देऊन संपूर्ण निवडणूकीचा आढावा घेतला.तद्नंतर मतदान साहित्य वितरण व संकल्प केंद्र व मोतमोजणी केंद्रांची पाहणी केली.केंद्रावरील प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी,आदि विविध मुलभूत सुविधा यांची पाहणी करून जिल्हाधिकारी किसन जावळे समाधान व्यक्त केले.

यावेळी निवडणूक निरीक्षकसंदिप निचित, निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आदेश डफल, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिनबच्छाव,पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ,नायब तहसीलदार संजय तवर,पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, उपस्थित होते.

# बामणदेव देवस्थानाजवळ जाणारा रस्ता पक्का बनणार

**नवी मुंबई : बातमीदार**

सारसोळे गावचे श्रद्धास्थान असलेले बामणदेव हे देवस्थान नवी मुंबईत प्रसिद्ध आहे.खाडीत हे देवस्थान असल्याने नागरिकांना लहानशा पायवाटेने या ठिकाणी जावे लागते. पावसाळ्यात झाडीझुडपे वाढलेली असतात. अशात नागरिकांना त्यातून वाट काढत जावे लागते. त्यामुळे या ठिकाणी पक्का रस्ता बांधून द्यावा, या कामाची निविदा होऊन कार्यादेश कंत्राटदारास दिला गेला आहे. मात्र वन विभागाच्या परवानगी अभावी हे काम रखडल्याचे माजी नगरसेवक सूरज पाटील यांनी वनमंत्र्यांच्या ही बाब लक्षात आणून दिली. यावेळी यशवंत तांडेल, कृष्णा तांडेल, अमोल मेहेर, देवनाथ मढवी, मोहन पाटील, पद्माकर मेहेर हे ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी मुंबईतील विविध विषयांसाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी वनविभाग, सिडको,मनपा अधिकारी यांच्या समवेत सारसोळे गावातील ग्रामस्थांची मिटींग घेतली. यावेळी ग्रामस्थांनी आपली समस्या मांडताना सांगितले की सारसोळे गावचे श्रद्धास्थान असलेले श्री बामणदेव हे धारण तलावालगत आहे.त्याठिकाणी असलेला जुना कच्चा रस्ता नवीन बनविण्यासाठी मनपाद्वारे निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कत्रांटदारास कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतु वनविभाग व इतर शासकीय परवानगीची अडचण सांगत मागील २ वर्षांपासून कामाला सुरुवात झालेली नाहीये. वनमंत्री गणेश नाईक यांनी सदर समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून काम सुरू करण्याबाबत वन अधिकारी तसेच पालिका अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

जेटीवर मच्छिमार बांधवांना होणारा त्रास पाहता आवश्यक असलेली पायवाट सुधारण्यासाठी वनविभागाने परवानगी द्यावी अशी देखील मागणी ग्रामस्थांनी केली होती.



# रोह्यात तीन उमेदवारांनी अर्ज घेतले मागे, प्रभाग २ ब मधून राष्ट्रवादीचे राजेंद्र जैन बिनविरोध

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेची निवडणूक चुरशीची होईल असे बोलण्यात येत असताना अर्ज मागे घेण्याच्या पहिल्याच दिवशी तीन उमेदवारांनी अर्ज मागे घेतलेला आहे. त्यामुळे दोन ब मधून २ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानंतर राष्ट्रवादीचे ( अजित पवार गट) राजेंद्र जैन हे बिनविरोध झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित १९ सदस्यांसाठी ६८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. रोहा अष्टमी नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी ३ तीन उमेदवार रिंगणात असून १९ सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी ६८ उमेदवार सध्या रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक २ ब मधुन राजेंद्र जैन बिनविरोध झाल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला आहे.

१९ तारखेला झालेल्या छाननीमध्ये सदस्य पदाच्या ७ उमेदवारांचे अर्ज बाद झाले होते. त्यामुळे सदस्य पदासाठी ७१ अर्ज कायम राहीले होते.अर्ज मागे घेण्याच्या पहिल्याच दिवशी ३ उमेदवारांनी सदस्य पदाचे अर्ज मागे घेतल्याने ६८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम राहिले आहेत. तर थेट नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार निवडणुकीसाठी अद्याप कायम आहेत. खा. सुनील तटकरे यांच्या बालेकिल्ला असलेल्या रोहा अष्टमी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक ही प्रतिष्ठेची बनली आहे.

# स्वदेस फाऊंडेशनतर्फे पेडांबे 'स्वप्नातील गाव' म्हणून सन्मानित

**माणगांव : बातमीदार**

म्हसळा तालुक्यातील पेडांबे या गावाने स्वच्छ, सुंदर, स्वास्थ्य, साक्षर व समृद्ध अशा पाचही मापदंडांवर उल्लेखनीय कामगिरी करत आराखड्यातील ८७% कामे पूर्ण केली असून, स्वदेश फाऊंडेशनन तर्फे 'स्वप्नातील गाव' म्हणून या गावाचा समारंभपूर्वक सन्मान करण्यात आला. गावातील नागरिक, मुंबईकर पेडांबे आणि तरुणांनी उत्तुंग एकजूट दाखवत गावाच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन एकत्रितपणे केले.

गावातील भित्तीचित्रे, सुविचारांनी सजलेल्या भिंती, आकर्षक रांगोळ्या व सुशोभिकरण यामुळे गावाचे सौंदर्य अधिक खुलून आले. या उपक्रमांमुळे पेडांबे गावाने स्वप्नातील गाव प्रकल्पात आपले वेगळे स्थान निर्माण केले. सन्मान समारंभाच्या दिवशी लेझीम व खालू वादकांच्या तालावर निघालेल्या भव्य मिरवणुकीने गाव दुमदुमले. महिलांचा सहभाग, तरुणांचे योगदान आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन–या तिन्हींच्या एकत्रित प्रयत्नांनी पेडांबेने विकासाचा नवा आदर्श ठेवला आहे.

कार्यक्रमास म्हसळा गट विकास अधिकारी माधव जाधव, ए. पी. आय. रविंद्र पारखे, शिवतेज ढउळ, नजीर शिखलगार, विशाल वरुटे, सरपंच जयदास भायदे, उपसरपंच हरिश्चंद्र जंगम, स्वदेस वरिष्ठ समन्वयक चांगदेव सानप, अजित कांगणे, गाव विकास समिती अध्यक्ष – नरेंद्र काजारे,



सचिव – सागर जाधव, स्वदेस मित्रष – स्वराली जाधव, अंगणवाडी सेविका विजया जाधव, माहिला अध्यक्ष सविता पाटील, गाव अध्यक्ष भिकू पाटील सचिव मच्छिन्द्रनाथ महाडिक, पेडांबे ग्राम सामाजिक संस्था अध्यक्ष धोंडू दाभेकर, सचिव प्रभाकर पाटील, विभागीय अध्यक्ष अशोक अधिकारी तसेच गाव विकास समिती सदस्य व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

स्वदेस फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली गावाने स्वच्छता उपक्रम, आरोग्य जनजागृती, रस्ते–सांडपाणी व्यवस्थापन, वृक्षारोपण, तरुणांचे कौशल्य विकास अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. बिडीओ माधव जाधव यांनी गावाचे अभिनंदन व कौतुक केले व स्वदेस च्या कार्याची स्तुती केली. तसेच सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी तंटामुक्त पेडांबे गावाचे अभिनंदन करून सायबर गुन्हे यावर मार्गदर्शन केले. सर्वांगीण विकासामुळे पेडांबे गावाने स्वप्नातील गाव करण्यात अभिमानाची मान उंचावली आहे.

# शिवसेनेच्या उमेदवार जिनी सॅम्युअल पत्रकार परिषदेत विरोधकांवर कडाडल्या

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या प्रभाग नंबर १५ मधील उच्चविभूषित शिवसेनेच्या उमेदवार जिनी एबीन सॅम्युअल यांच्यावर काटरंग मधील एका कार्यकर्त्यांनी बाहेरच्या उमेदवार म्हणून आरोप करीत या पाच वर्षात मतदारसंघात फिरकल्याच नाही असा आरोप सोशल मीडियावर केला, जिनी सॅम्युअल यांनी या आरोपांना उत्तर देण्यासाठी आज बुधवारी तातडीची पत्रकार परिषद आयोजित केली,त्यांच्यावर करण्यात आलेल्या सर्व आरोपांना जीनी सॅम्युअल यांनी पत्रकार परिषदेत एकेक आरोपांना सडेतोड उत्तर देत आपली भूमिका स्पष्ट केली .

त्यांनी बोलताना सांगितले की,आपणास बाहेरचा उमेदवार म्हणून हिणविले जाते, तसेच दादागिरी केली जाते असे संबंधित एका ग्रामस्थांनी आरोप केला त्यावरही त्यांनी तो गंभीर आरोप खोडून काढला आहे. आपण मूळच्या खोपोली गावातीलच स्थानिक असून माझा जन्म खोपोली गावातच झाला आहे त्याचप्रमाणे माझे सासरचे सॅम्युअल परिवाराही गेले पन्नास वर्षाहून अधिक काळ या खोपोलीच्या सामाजिक राजकीय कार्यात झोकुन काम करीत आहेत. असे असतानाही अशा प्रकारचे आरोप करून अप्रचार करणे हे त्यांना शोभत नाही. अशा आरोपांमुळे आपण व्यथित झालो आहे नगरपरिषद निवडणुकीत अशा प्रकारचे आरोप करीत राजकीय वातावरण दूषित



करण्याचा हा त्यांचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. आपला कुणावरही दोषारोप करण्याचा प्रयत्न नसून आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे त्यांनी विनम्रपणे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मतदारसंघातील मतदारांना माझ्या कामाची पद्धत माहीत असून त्यामुळेच मी निवडणुकीला सामोरे जात आहे व मतदार माझ्यावर विश्वास व्यक्त करतील यात शंका वाटत नाही. आपणास शिवसेना भाजप रिपाई तर्फे या ठिकाणी उमेदवारी देण्यात आली आहे .त्यांनी काटरंग गावातील प्रत्येक घराशी आपला व आपल्या कुटुंबीयांचा अनेक वर्षापासून वैयक्तिक संबंध असल्याचे सांगताना, आपणावर होत असलेल्या आरोपाबाबतही अनेकांनी नाराजी व्यक्त करीत आपणास प्रत्यक्ष भेटून दिलासा देण्याचा प्रयत्न केल्याचे जिनी सॅम्युअल यांनी बोलताना सांगितले

# आदिवासींचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित

**उरण : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील दुष्मी–खारपाडा ग्रुप ग्रामपंचायतीतील वडमाळवाडी पाणीपुरवठा योजनेस वाढीव निधी मिळावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर व आदिवासी बांधव उद्या दिनांक २० नोव्हेंबर पासून पेण पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार होते. मात्र या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांनी अजून पंधरा दिवसांचा कालावधी द्यावा अशी विनंती करीत उपोषण मागे घेण्याची विनंती केल्याने उपोषण स्थगीत करण्यात आले

दरम्यान स्वातंत्र्यानंतर तब्बल ७६ वर्षांपासून वडमाल वाडीला पिण्यासाठी शुद्ध पाणी नव्हते. यासाठी आदिवासिंनी मोठा संघर्ष करून जल जीवन मिशन योजना मंजूर झाली परंतु त्यास कमी पडत असलेली वाढीव निधी तात्काळ उपलब्ध करून काम पूर्ण करावे या मागणीसाठी शेवटचा पर्याय म्हणून ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्यासह आदिवासी महिला बचत गटाच्या अध्यक्षा नर्मदा वाघे व इतर सर्व ग्रामस्थानी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला होता.



# वाढत्या गारव्यामुळे मासळीची आवक कमी, दरात वाढ

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यापासून वातावरणातील गारठा वाढल्याने ताज्या मासळीची आवक घटली आहे. परिणामी,मासळीचे भाव देखील वाढले आहेत.

नवी मुंबईतील खाडी किनारी मिळणारी मासळी ही वातावरणातील गारठया मुळे कमी प्रमाणात मिळु लागली आहे. वातावरणातील बदलाचा फटका हा समुद्रातील मासळीच्या विविध प्रजातीला बसला जातो . त्यात गारठा वाढला की समुद्रातील तापमानही कमी होते, त्यामुळे खोल समुद्रातील मासळीही गारठल्याने ती तळाला गेली आहे. त्यामुळे मासळीची ४० टक्केपेक्षा अधिक आवक घटली आहे. परिणामी मासळीच्या दरातही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे खवय्यांबरोबर मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.




नवी मुंबईतील बहुतांश मच्छीमार हे मुंबई येथील भाऊचा धक्का व कुलाबा येथून ताजी मासळी खरेदी करतात.मात्र त्या मासळीची देखील आवक कमी झाल्याने त्यांना देखील भाव वाढीचा फटका बसला आहे.एकीकडे गारठा वाढला तर दुसरीकडे वाढते प्रदूषण याचा सगळा फटका मासळीच्या आवक वर होतो. त्यामुळे कमी मासळी मिळत असल्याने त्यांचे दर ही वाढीव झाले आहेत. दिवाळे खाडी पासून ते ऐरोली खाडी पर्यंत स्थानिक मच्छिमार मासेमारी करतात .या खाडीतून मासे, निवढी, बोईस, कोलंबी तसेच चिवणी मिळतात,पण गारठा वाढल्याने त्यांची देखील आवक खूपच कमी झाली आहे. त्यामुळे मच्छिमार बांधवांची दिवसभराची मेहनत वाया जात असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरवर्षी प्रत्येक बदलत्या वातावरणाचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो. त्यानुसार सध्या वातावरणातील गारव्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना आवश्यक त्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने कधी– कधी रिकाम्या हाती परतावे लागते. उन्ह वाढले की जाळ्यात मासोळी सापडली जाते. समुद्रातील वाढते प्रदूषण आणि बदलत्या वातावरणामुळे अनेक प्रकारचे मासे गायब होऊ लागले आहेत. पापलेट, सुरमई, घोळ आणि इतर अनेक प्रजातीचे मासे मिळेनासे झाले आहेत. मांदेली आणि बोंबील, बांगडे हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासेही महाग झाले आहेत. त्याचा परिणाम मासळीच्या दरवाढीवर झाला आहे. काहींना काही कारणाने मासेमारी संकटात येते. कधी समुद्रात घोगावणारे वादळ, प्रदूषण तर कधी बदलते वातावरण अशा विविध कारणाने मासळीच्या आवक वर परिणाम होत आहे.

**असे आहेत सध्याचे दर**

**सुरमई – ११०० रुपये किलो**
**पॉपलेट १००० रुपये किलो**
**काफरी पॉपलेट – १५०० रुपये किलो**
**किलो कोळंबी – ७०० रुपये किलो**
**किलो घोळ – १३०० रुपये किलो**
**जिताडा – १२०० रुपये किलो**
**हलवा – ९५० रुपये किलो**

**दुखवटा**

## बाळाराम पाटील



**पनवेल :** कोंडले येथील भाजप कार्यकर्ते रवींद्र पाटील यांचे काका बाळाराम पांडुरंग पाटील यांचे सोमवार (दि १७ )रोजी निधन झाले मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांचा दशक्रिया विधी बुधवार( दि २६) रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे रसायनी येथे, तर उत्तरकार्य शनिवारी (दि २९) रोजी कोंडले येथे राहत्या घरी होणार आहे

# नावडेत अनधिकृत आठवडा बाजारावर कारवाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या नावडे उपविभागातील मन्नान कॉलनी, पापडीचापाडा येथे भरविण्यात आलेल्या अनधिकृत बाजारावर मंगळवारी (दि.१८) पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-अ, उपविभाग नावडे यांच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली. या अतिक्रमण विरोधी कारवाईदरम्यान प्रभाग अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केल्याप्रकरणी चार जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार व उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या सुचनेनूसार प्रभाग अधिकारी अरविंद पाटील यांनी खारघरमधील मन्नान कॉलनी, पापडीचापाडा येथे अनधिकृत आठवडे बाजारासाठी आलेल्या फेरीवाले, हातगाड्यांवर तोडक कारवाई केली व बाजार बंद करण्यात आला.

अनधिकृत आठवडा बाजारांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानूसार पुन्हा एकदा अनधिकृतपणे आठवडा बाजारांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने कडक कारवाईस पालिकेने सुरूवात केली आहे.

## कळंबोलीसह कामोठ्यातील दोन व्यक्तींची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील कामोठे बस थांब्याजवळ दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटना घडल्या. काही दिवसांपासून येथील चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. याविषयी कळंबोली आणि कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.




कामोठे सेक्टर ३५ मधील गृहस्थ नातेवाईकांना बस थांब्यावर सोडायला आले होते. गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने पन्नास हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोरल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या घटनेत कामोठे येथील ३० वर्षीय महिला प्रवासी तमिळनाडू ते कामोठे असा बस प्रवास करताना त्यांच्या प्रवासातील बॅगमधून दोन लाख ८० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरले आहेत. ४० ग्रॅम वजनाचे सोने चोरीस गेल्यामुळे या महिलेने ऑनलाइन तक्रार केली. त्यानंतर याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली.

# नायजेरियन महिला उलवे येथून जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

पासपोर्ट-व्हिसाची मुदत संपूनही बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या महिलेला उलवे पोलीस ठाणे आणि अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या संयुक्त कारवाईत जेरबंद करण्यात आले आहे.

उलवे येथे बेकायदेशीररित्या वास्तव्य करणारी नायजेरियन महिला इमेलीन बंगाह हिला अटक करण्यात आली आहे. पासपोर्ट आणि व्हिसाची मुदत संपल्यानंतर देखील सदर महिला कोणत्याही कायदेशीर नोंदी अथवा सी-फॉर्मशिवाय उलवे येथे रहात असल्याचे आढळून आले आहे. या महिला विरोधात उलवे पोलीस ठाण्यात बीएनएस कायदा कलम ३१८ तसेच द इमिग्रेशन अँड फॉरेनर अॅक्ट २०२५चे कलम २१, २३, २४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उलवेमध्ये आफ्रिकन महिला बेकायदेशीररित्या वास्तव्यास असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. माहितीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने कारवाई केली.

## कर्ज काढण्याच्या बहाण्याने सव्वा कोटींची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीमधील एका व्यक्तीची वस्तू खरेदीसाठी कर्ज काढण्याच्या बहाण्याने तब्बल एक कोटी ३५ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे.

सेक्टर ५ मधील ४० वर्षीय व्यक्तीचा विश्वास संपादन केल्यावर स्वतःचे बँक खाते बंद असल्याचा बहाणा करून कर्जावर वस्तू खरेदीसाठी प्रवृत्त केले, मात्र कर्जाचे हप्ते भरण्याची वेळ आल्यावर हप्तेही भरले नाहीत आणि कर्जावरील वस्तूसुद्धा परत दिल्या नाहीत. या बदल्यात विश्वास संपादनासाठी वेगवेगळे धनादेश दिले. अखेर महागडा मोबाईल फोनसारख्या वस्तूही गमावल्या आणि कर्जाचे हप्तेसुद्धा अंगावर पडल्याने या पीडिताने पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदवला.



**पनवेल : ओवळे (साई मंदिर) येथील रूचिरा शंकर म्हात्रे हिने उच्च शैक्षणिक क्षेत्रात मोठी झेप घेतली असून ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित मॅक्वेरी युनिव्हर्सिटी, सिडनी येथे मास्टर ऑफ डेटा सायन्समध्ये यश मिळविले. याबद्दल रूचिराचे अभिनंदन होत आहे.**

# पनवेल महापालिका शाळांमध्ये पर्यावरणदूत निवड जनजागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने पर्यावरण दूतांची निवड करण्यासाठी कोपरा, मुर्बी, खारघर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत १५ नोव्हेंबर रोजी कोपरा, मुर्बी, खारघर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादामध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. याबरोबरच प्रत्येक शाळेतून उत्साही व जबाबदार विद्यार्थ्यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली. हे पर्यावरण दूत पनवेल महानगरपालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार आहेत.

पर्यावरण विभागाच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले असून, या माध्यमातून तरुण पिढीमध्ये पर्यावरणपूरक विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड गणित अध्यापक मंडळ यांच्यातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारी गणित संबोध ही परीक्षा यंदा २८ सप्टेंबर २०२५ रोजी झाली. या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी इंग्रजी माध्यम मधील पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपले गणितीय कौशल्य सिद्ध करत उत्कृष्ट कामगिरी केली.



विद्यार्थ्यांच्या या लक्षणीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विजयी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. पाचवीच्या गटात हर्षद पाटील, पल्लव म्हात्रे, अनन्या पाटील, विभावरी पवार आणि सौम्या पाटील यांनी प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक मिळवून ऋत्वी देसाई, सौम्या संकपाळ, उन्नत बदाद, ईशानी वरल आणि अन्वित शेवाळे यांनी आपली बुद्धिमत्ता दर्शवली. तर, जाग्रवी कांगणे, स्वराज भोईर, स्वरूप मोहिते, अनुश्री खातू, तत्त्वी वाल्मिकी आणि मयंक गुप्ता यांनी तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. तसेच आठवीच्या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत दमदार कामगिरी केली. प्रचिती इंगळे, पूर्वी चेऊळकर, आयुष म्हात्रे आणि निधी पाटील यांनी प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. सेजल शेळके, श्रावणी सकपाळ, रचना वाघमारे, रिया कदम, श्रेया बिरादार आणि शर्वरी जाधव यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यासोबतच, ईश्वरी भोपी आणि पार्थ बागवे यांना तृतीय क्रमांक मिळाला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशामागे गणित शिक्षिका नीता बालशी, मनिषा पाटील तसेच सर्व गणित शिक्षक यांचे विशेष मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या सोहळ्याला मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि अॅड. राहुल घरत उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात आनंद मेळावा उत्साहात साजरा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातर्फे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्य अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते आनंद मेळाव्याचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी अर्चना ठाकूर यांचे शाल श्रीफळ व नॅपकिन बुके देऊन स्वागत केले. तसेच उपस्थित मान्यवर प्राचार्य प्रशांत मोरे पर्यवेक्षक अजित सोनवणे यांचेदेखील नॅपकिन बुके देऊन स्वागत केले.

मेळाव्यामध्ये पूर्व प्राथमिक विभाग व इयत्ता पहिलीच्या पालकांनी, विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, शोभेच्या वस्तू, भाज्या, फळे, स्टेशनरी यांचे स्टॉल लावले होते. उपस्थित मान्यवरांनी खाद्यपदार्थाचा आनंदाने आस्वाद घेतला. मेळाव्याला पालक व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यवहार व पैशाची देवाण-घेवाण यांचा अनुभव मिळाला. सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी उपस्थित मान्यवरांचे श्ब्द्सुमनाने आभार मानले.



**पनवेल : भाजपचे खारघर शहर मंडळ सरचिटणीस फुलाजी ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी गुरू शंकर ठाकूर, अशोक जैन आदी उपस्थित होते.**

# पनवेलकरांना 'असंभव'ची उत्कंठा

**पनवेल : वार्ताहर**

मराठीतील चार नावाजलेले, गुणी आणि दमदार कलाकार म्हणजे मुक्ता बर्वे, सचित पाटील, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी हे'असंभव' चित्रपटाच्या निमित्ताने एकत्र आले आहेत. त्यांची अभिनयातील प्रगल्भता आणि विविध भूमिकांचा अनुभव यामुळे या चित्रपटात काहीतरी दर्जेदार पाहायला मिळणार असल्याचा विश्वास प्रेक्षक व्यक्त करत आहेत.

'असंभव'मध्ये कलाकारांइतकीच ताकद निर्मिती विभागातही आहे. अनुभवी निर्माते, सहनिर्माते एकत्र आल्याने हा प्रकल्प भक्कम पाया घेऊन उभा राहिला आहे. सदर चित्रपट हा येत्या रविवारी म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल येथील ओरायन मॉल येथे असलेल्या पीव्हीआरमध्ये मोठ्या थाटात पदर्शित होत असून त्याची उत्कंठा पनवेलकरांना लागली आहे.

अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केल्यानंतर 'असंभव'च्या निमित्ताने पहिल्यांदाच पूर्णपणे निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवणारे सचित पाटील. पहिल्याच निर्मितीसाठी त्यांनी सर्वोत्कृष्ट चित्रपटाची निवड केली आहे. तर मराठी चित्रपटसृष्टीतील अत्यंत अनुभवी नाव म्हणजे नितीन वैद्य.चाळीसहून अधिक मराठी चित्रपटांची निर्मिती केलेल्या नितीन वैद्य यांना चित्रपट निर्मितीची उत्तम जाण आहे. बांधकाम उद्योगातील विश्वासार्ह आणि नावाजलेलं नाव मंगेश परुळेकर आणि संजय पोतदार यांसारखे भक्कम सहनिर्माते 'असंभव'ला लाभल्यामुळे या चित्रपटाची उंची अधिकच वाढली आहे.



'असंभव'ची कथा कपिल भोपटकर यांनी लिहिली असून पटकथा कपिल भोपटकर, विशाल इनामदार आणि सचित पाटील यांनी लिहिली आहे. तर या तिघांच्या लेखनकौशल्याने कथानकाला थरार, भावना आणि वळण मिळाले आहे. एकंदरच प्रत्येक विभागाने आपलं सर्वोत्तम दिल्याने 'असंभव' हा कधी न पाहिलेला, भव्य आणि उच्च निर्मितीमूल्य असलेला चित्रपट बनला आहे.

मराठीतील चार गुणी कलाकार सचित पाटील, मुक्ता बर्वे, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी पहिल्यांदाच या चित्रपटाच्या निमित्ताने एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. मुंबई पुणे फिल्म्स एंटरटेनमेंट'चे सचित पाटील आणि नितीन प्रकाश वैद्य हे चित्रपटाचे निर्माते असून, एरिकॉन टेलिफिल्म्सच्या शर्मिष्ठा राऊत, तेजस देसाई आणि पी अँड पी एंटरटेनमेंटचे मंगेश परुळेकर व संजय पोतदार हे सहनिर्माते आहेत. रहस्य, भावना आणि नात्यांच्या गुंफलेल्या कथेतून उलगडणारा हा थरारक सिनेमा २१ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

# कामोठ्यात पालिकेच्या कचऱ्याला आग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील मानसरोवर रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या मैदानात मंगळवारी सकाळी पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष छाटणीतून पडलेल्या कचऱ्याला अचानक आग लागून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले आणि धुराचे मोठे लोट परिसरात पसरू लागले.



आगीची माहिती मिळताच भाजपचे माजी नगरसेवक विकास घरत यांनी तातडीने अग्निशमन दलाशी संपर्क साधला. त्यानंतर पनवेल महापालिकेच्या दोन अग्निशमन गाड्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तत्काळ आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले; मात्र झुडपे, सुक्या फांद्या व अन्य कचऱ्यामुळे आगेत जलद वाढ झाली. पहिल्या गाडीतील पाणी अवघ्या २० मिनिटांत संपल्याने दुसऱ्या गाडीच्या मदतीने संयुक्तरीत्या प्रयत्न करून अखेर आग पूर्णतः नियंत्रणात आणण्यात यश आले. या आगीत दोन झाडांना झळ पोहोचल्याचे समजते.

माजी नगरसेवक घरत यांनी पालिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले, मोकळ्या मैदानात नियमितपणे कचरा आणि वृक्षछाटणीचा माल टाकला जातो. त्यातूनच अशा दुर्घटना घडत आहेत. जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

एकीकडे महापालिकेचा स्वच्छता विभाग डीप क्लिनींगसारखे अभियान घेऊन अनेक वर्षे किंवा महिन्यांपासून साचलेला कचऱ्याचा तो परिसर स्वच्छ करते आणि दूसऱ्या ठिकाणी वृक्ष छाटणीचा कचरा त्याच जाग्यावरच पडून स्वच्छ परिसर अस्वच्छ करून पुन्हा डीप क्लिनींग करण्याची स्थिती निर्माण केली जाते.

**वृक्ष प्राधिकरण, स्वच्छता आणि वाहन विभाग यांच्यामधील असमन्वयातून अशी घटना घडत असल्याने पालिकेत संयुक्त कामगिरीचा अभाव या घटनेतून दिसत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. या घटनेची चौकशी करून संबंधित कारणेभूत अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात येईल.**

**-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापलिका**

# एमएनएम विद्यालयात परिवहन समिती सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शालेय बसमध्ये उपलब्ध सोयी सुविधा, तसेच विद्यार्थी परिवहन संदर्भातील बाबाची कार्यवाही यांची साधक बाधक चर्चे करिता न्हावा शेवा वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकारी वैशाली गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली एमएनएम विद्यालयात परिवहन समितीची सभा घेण्यात आली. सदरहू सभेचे प्रास्ताविक राहुल म्हात्रे यांनी केले.



शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी वैशाली गलांडे मॅडम यांचे स्वागत केले. तसेच शालेय परिवहन विभागाच्या प्रमुख सारिका पाटील यांनी इतर मान्यवरांचे स्वागत केले. सभेला संबोधित करताना वैशाली गलांडे मॅडम यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी बसमध्ये कोणत्या सुविधा उपलब्ध असाव्यात, बस संदर्भातील कायदेशीर कागदपत्रे अद्यावत ठेवावीत, तसेच विद्यार्थी सुरक्षा सर्वात महत्त्वाची असून या संदर्भात वाहक आणि बस मदतनीस यांनादेखील उपयुक्त मार्गदर्शन केले. शाळेच्या प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधींना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेच्या मुख्यालयात बुधवारी (दि.१९) भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्ताने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्ताने राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त आयुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते, सामान्य प्रशासन किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## संपादकीय

# युतीधर्म महत्त्वाचा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडी वेगाने घडत आहेत. सर्वच पक्षांनी निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. ते स्वाभाविकच आहे. निवडणुकीचे पडघम वाजू लागल्यानंतर पक्षांतराचे वारे वाहू लागतात तसेच नाराजी, बंडखोरी वगैरेही होतच असते. यात नवीन काही नाही.

**राजकीय वर्तुळात मंगळवारी दिवसभर शिवसेनेचे मंत्री नाराज असल्याची चर्चा रंगली होती. मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीला शिवसेनेतील एकही मंत्री उपस्थित नव्हते यातूनच नाराजीनाट्याची चर्चा सुरू झाली. केवळ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकीला हजेरी लावली. परंतु संवाद साधणे म्हणजे नाराजी नव्हे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील चर्चा ही एका कुटुंबातील चर्चा होती. या चर्चेला नाराजी म्हणता येणार नाही असा खुलासा मंत्री आणि शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी बुधवारी केला. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही, महायुती म्हणून एकत्र लढण्याबाबत चर्चा झाली. सर्वात जास्त जागांवर युती करायची आहे. त्यामुळे आरोप-प्रत्यारोप बाजूला सारून एकत्र रहावे असे प्रतिपादन मंगळवारीच माध्यमांशी बोलताना केले. तेव्हा जे काही कथित नाराजीनाट्य मंगळवारी रंगले होते ते संपुष्टात आल्याचे एव्हाना पुरते स्पष्ट झाले आहे. मात्र त्यासंदर्भात विरोधकांपैकी काही विशिष्ट नेत्यांकडून ज्या काही टोमणेसदृश प्रतिक्रिया लगेच समाजमाध्यमांवर व्यक्त करण्यात आल्या, त्यातून विरोधकांना झालेला आसुरी आनंद तेवढा उघड झाला. सामंत यांनीही या आसुरी आनंदाचा उल्लेख बुधवारी केला व याकडे दुर्लक्ष करून युतीधर्माचे पालन सर्वांनी करायचे आहे यावर भर दिला. शिवसेनेतील नगरसेवकांच्या भारतीय जनता पक्षात सुरू असलेल्या पक्षप्रवेशामुळे तसेच निधी वाटपामुळे शिवसेनेत नाराजी निर्माण झाल्याचे सांगितले गेले. यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीनंतर शिवसेनेच्या काही मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीतील चर्चेचा तपशील स्पष्ट झाला नसला तरी, मित्रपक्षांतील नेत्यांना घेणे तुम्हीच सुरू केले आहे असे फडणवीस यांनी शिवसेनेच्या नेत्यांना सुनावल्याचे सांगितले जाते. फडणवीस यांनी नापसंती व्यक्त करताच शिवसेना नेत्यांनी सामोपचाराची भूमिका घेतली. या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांनी, यापुढे महायुतीतील घटक पक्षातील नेते, पदाधिकारी, नगरसेवक यांना पक्षात घेऊ नये अशा सूचना दिल्याचे सांगण्यात आले. संध्याकाळी उशीरा शिंदे यांनीही शेवटी आपण जनतेच्या सेवेसाठी एकत्र आलो आहोत असे सांगत पक्षातील नेत्यांना शांत केले असे कळते. या भेटीनंतर मंत्री प्रताप सरनाईक यांनीही एका कुटुंबामध्ये वादविवाद होत राहतात. पण हे तीन पक्षांचे महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे एकमेकांच्या मनातील भावना एकमेकांकडे व्यक्त केल्या जातात. त्यामुळेच आपण शिंदे यांच्यासह फडणवीस यांच्याकडे गेलो होतो. आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्यानंतर त्यावर लगेच निर्णयदेखील घेण्यात आला असेही सरनाईक यांनी सांगितले. राज्यात काही जिल्ह्यांमधील पक्षांतरांबद्दल दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये नाराजी होती. ही नाराजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी समजून घेतली आणि त्यावर तोडगा काढला. आता महायुतीमधील घटक पक्षातील कुणीही कुठल्या पक्षातील नेते, पदाधिकारी, नगरसेवक घेऊ नये असा निर्णय झाला आहे. हा तोडगा सामोपचाराने निघाला आहे असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. राजकारणात कळत नकळत काही गोष्टी होतात. त्यामुळे विसंवाद होतो. असा विसंवाद होऊ नये असे ठरले आहे असे नंतर सांगण्यात आले.**

# मोकाट कुत्री-गुरांबाबत अंमलबजावणी आवश्यक





**खबरबात**
**शैलेश पालकर**

स्वातंत्र्यानंतर, सार्वजनिक आरोग्यात लक्षणीय प्रगती असूनही, भारत रेबीजशी संबंधित मृत्युदराच्या जगातील सर्वोच्च आकडेवारीपैकी एक नोंदवत आहे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (NCDC) यांनी केलेल्या वैज्ञानिक मूल्यांकनांमध्ये असा अंदाज आहे की भारतात दरवर्षी प्राण्यांशी संबंधित मृत्यूंचे मोठे प्रमाण रेबीजमुळे होते, ज्यामध्ये ९०% पेक्षा जास्त मानवी प्रकरणे पाळीव किंवा भटक्या कुत्र्यांनी केलेल्या चाव्यामुळे होतात. या धोक्याचा सर्वाधिक फटका मुले, वृद्धांना बसला आहे.

भारतात येणारे परदेशी नागरिकही विनाकारण भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी पडत आहेत. बेंगळुरूमध्ये घडलेल्या अशाच एका घटनेत, एका वेल्श उद्योजकाला सकाळी धावताना एका भटक्या कुत्र्याने चावा घेतला. ही घटना अधोरेखित करते की हा धोका केवळ ग्रामीण किंवा दाट लोकवस्तीच्या परिसरात किंवा असुरक्षित नागरिकांपुरता मर्यादित नाही, तर सार्वजनिक सुरक्षा, पर्यटन आणि जागतिक दृष्टिकोनातून देशाच्या प्रतिमेवर परिणाम करणारे प्रमाण गृहीत धरले आहे.

स्थानिक पोलिस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशी जोडल्या जातील जेणेकरून त्यांचे रिअल-टाइम निवारण आणि देखरेख करता येईल. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अध्यक्षांसह, योग्य प्रशासकीय आदेश आणि क्षेत्रीय देखरेखीद्वारे या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करतील. ते त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रात होणाऱ्या चुका किंवा पुनरावृत्ती होणाऱ्या घटनांसाठी संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरतील. उपरोक्त निर्देश संपूर्ण भारतात समान रीतीने लागू केले जातील आणि सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव; अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण; आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत संघ आजपासून आठ आठवड्यांच्या आत स्थिती-सह-अनुपालन प्रतिज्ञापत्र दाखल करतील,

ज्यामध्ये हे दर्शविले जाईल, अशाप्रकारच्या निर्देशांचा उल्लेख सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये नमूद केले आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता, न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांनी दिलेल्या निकालाची व्याप्ती देशव्यापी असून तीन आठवड्यात कारवाईची अपेक्षा अधोरेखित करणारी आहे. या निकालामुळे नागरिक आणि मानवजातीच्या सुरक्षिततेला अनन्यसाधारण महत्त्व आहे, प्रशासनाने या महत्त्वाच्या मुद्यांवर विशेष लक्ष दिले पाहिजे हे खडसावले आहे.

नगरपंचायत पोलादपूर आणि रायगड जिल्हाधिकारी यांना पोलादपूरचे कायदेतज्ज्ञ जेष्ठ नागरिक पंडीत उर्फ सुधीर चित्रे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्याया निकालाचा हवाला देत मोकाट कुत्री-गुरांच्या बंदोबस्तासाठी टपालाद्वारे निवेदन पाठविले आहे. घरपट्टीवाढीबाबत पोलादपूरचे नागरिक नगरपंचायतीकडून त्रासलेले असताना याखेरिज, मोकाट कुत्री, गुरे आणि माकडांच्या त्रासाबाबत नगरपंचायतीकडून सपशेल दूर्लक्ष होत असल्याने सुधीर चित्रे यांनी हे निवेदन पाठविण्याचा निर्णय अंमलात आणला आहे. यामुळे पोलादपूर नगरपंचायतीला केवळ बंदोबस्ताचे उपक्रम राबविण्याच्या बातम्या करण्याऐवजी ठोस भूमिका बजावणे भाग पडले आहे

ग्रुपग्रामपंचायत पोलादपूरची ग्रामपंचायत झाल्यानंतर पोलादपूर शहरात गांवडुक्करांची सुळसुळाट मोठया प्रमाणात होता. मात्र, त्यावर ग्रामपंचायतीने ठोस कारवाई करून गावडुक्करांचा कायमचा नायनाट केला होता. पाच वर्षांपूर्वी पहाटेच्या सुमारास पोलादपूर शहरातील तब्बल २३ कुत्र्यांची धरपकड सोसायटी ऑफ ऍनिमल प्रोटेक्शन या कोल्हापूर येथील संस्थेच्या सहकाऱ्यांमार्फत करण्यात येऊन स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहात नेण्यात आले.

याठिकाणी कुत्र्यांना जनरल अनेस्थेशियाचा डोस देऊन गुंगीमध्ये ठेऊन ऍण्टीरेबीज व्हॅक्सीन, ऍण्टीबायोटिक्स लसीकरण करून झाल्यानंतर निर्बिजीकरणाची छोटीशी शस्त्रक्रिया केली गेल्याची माहिती सचिन देऊळकर या पशूवैद्यकीय उपचारतज्ज्ञांकडून प्रस्तुत प्रतिनिधीस दिली. श्वाननिर्बिजीकरणाचा ठेकेदारी उपक्रम राबविण्याचा प्रकार नगरपंचायत पोलादपूरने हाती घेतल्यानंतरही मोकाट कुत्र्यांना पिलं झाल्याचे दिसून आले. खासगी कुत्र्यांचे मालकदेखील अनेकदा पट्टा न लावता कुत्रे मोकळे सोडत असल्याचे दिसून आले आहे.

आज आपल्याला मटनमार्केट आणि मच्छीविक्रेते पोलादपूर शहरात सर्वत्र विखुरले गेले दिसत आहेत. चिकनसेंटरही शहरात कुठेही उभारली जात असल्याने कुत्र्यांना थेट कच्चे मांस खाण्याची संधी मिळून ते आक्रमक झाले आहेत. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये २०१९ मध्ये ८३ जणांना श्वान दंश झाला तर २०२० मध्ये ९४ जणांना श्वानदंश झाल्याची माहिती प्राप्त झाली होती.

काही वर्षांपूर्वी पोलादपूर एस.टी.बस स्थानकामध्ये एका गायीचा बसखाली सापडून मृत्यू झाल्याची घटना झाली होती. पोलादपूर एस.टी.बसस्थानकाबाहेरील पाचही पुलांवर गायी व बैलांची झुंबड दिसून येते. रात्रीच्यावेळी ही मोकाट जनावरे रस्त्यावर ठिय्या देउन बसतात काळोखामुळे वाहनचालकांना अंदाज येत नाही त्यामुळे अपघात होत आहेत.

पोलादपूरमध्ये २०२१ यावर्षी माकडाच्या चाव्याने एक महिला जखमी होण्याच्या घटनेनंतर अद्याप पोलादपूर नगरपंचायतीने पोलादपूर तालुका वन विभागाकडे माकड पकडण्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. त्यामुळे नगरपंचायतीच्या कारभारा बद्दल शंका निर्माण होते

पोलादपूरमध्ये माकडांचे हल्ले, मोकाट जनावरांमुळे होणारा उपद्रव तसेच श्वानदंशाच्या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेऊन पोलादपूरकर आबालवृध्द स्त्रीपुरूष नागरिकांना सुरक्षिततेचे जीवन तसेच वावरणे देणे हा त्यांचा अधिकार अबाधित ठेवण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने महापालिका व इतर सर्व संस्थांना दि.०७-११-२०२५रोजीच्या तीन न्यायमुर्तींच्या निकाल पत्राने आदेश दिले आहेत. या आदेशाबद्दल गांभिर्याने दखल घेऊन आपण शहरातील भटक्या कुत्र्यांच्या तसेच मोकाट जनावरांच्या उपद्रवाचा त्वरीत बंदोबस्त करण्याच्या विनंतीचे निवेदन रायगड जिल्हाधिकारी आणि पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांना पोलादपूर येथील कायदेतज्ज्ञ ज्येष्ठ नागरिक सुधीर तथा पंडीत चित्रे यांनी दिले आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# रिअलमी जिटी ८ प्रो आज भारतात होणार लाँच

टेक कंपनी रिअलमी २० नोव्हेंबर रोजी भारतात त्यांचा नवीन मध्यम-बजेट फ्लॅगशिप स्मार्टफोन, रिअलमी जिटी ८ झी लाँच करत आहे. हा लाँचिंग कार्यक्रम दुपारी १२ वाजता सुरू होईल.



या फोनमध्ये शक्तिशाली कामगिरी, प्रीमियम डिझाइन, उच्च दर्जाचा डिस्प्ले आणि प्रगत कॅमेरा सिस्टम आहे.

कंपनीचा दावा आहे की हा आतापर्यंतचा सर्वात प्रगत रिअलमी फोन असेल, जो फोटोग्राफी आणि गेमिंग दोन्हीमध्ये व्यावसायिक दर्जाचा अनुभव देईल. या स्मार्टफोनमध्ये २०० मेगापिक्सेल टेलिफोटो कॅमेरा आणि ७००० एमएएच बॅटरी असेल.

कंपनीने अलीकडेच चीनमधील आपल्या बाजारपेठेत रिअलमी जिटी ८ झी लाँच केला आहे, जो पाच स्टोरेज प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. तिथे त्याची किंमत २,८९९ युआन (अंदाजे ३५,८५०) पासून सुरू होते. भारतात, तो ३५,०००च्या सुरुवातीच्या किमतीत लाँच केला जाऊ शकतो.

डिझाइन : कस्टमाइज्ड कॅमेरा रिंग्जसह ३ रंग पर्याय

रियलमीने जिटी ८ मालिकेच्या डिझाइनवर विशेष लक्ष दिले आहे. जिटी ८ झी मध्ये मेकॅनिकल असेंब्ली डिझाइन आहे, म्हणजेच कॅमेरा डेको घटक एकमेकांना बदलता येतात. तुम्ही तुमच्या आवडीनुसार कॅमेरा रिंग्ज कस्टमाइझ करू शकता.

हा फोन तीन रंगांमध्ये उपलब्ध आहे : पांढरा (फ्रॉस्टेड ग्लास), निळा (रीसायकल केलेला लेदर) आणि हिरवा (कागदी पोत). रिअलमी जिटी ८ मध्ये प्रीमियम डिझाइन देखील आहे, ज्यामध्ये गोलाकार कॅमेरा मॉड्यूल आणि एक पातळ धातूची फ्रेम आहे. हा फोन फक्त ७.८ मिमी पातळ आहे आणि त्याचे वजन सुमारे १९० ग्रॅम आहे.

क्वालकॉमच्या स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ प्रोसेसर आणि आर १ द ग्राफिक्स चिपसह सुसज्ज आहे, ज्याला ७,०००m-h बॅटरी आहे. डिव्हाइसमध्ये १४४Hz रिफ्रेश रेटसह २K OLED डिस्प्ले आहे आणि पाणी आणि धूळ प्रतिरोधासाठी आयपी ६९, आयपी ६८ आणि आयपी ६६ रेटिंग आहे. हा फोन धूळ आणि पाणी प्रतिरोधक आहे, ज्यामुळे तो बराच टिकाऊ बनतो.

# मराठी संशोधक यशवंत देशपांडे



**निमित्त**

यशवंत खुशाल देशपांडे ख्यातनाम मराठी संशोधक, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील पापळ ह्या गावी त्यांचा जन्म १४ जुलै १८८४ रोजी झाला. त्यांचे वडील खुशालराव हे अकोला जिल्ह्यातील धनज ह्या गावी सब-रजिस्ट्रारच्या हुद्यावर होते. यशवंतरावांचे प्राथमिक शिक्षण धनज येथेच झाले. यशवंत खुशाल देशपांडे यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्या विषयी या लेखातून...

माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी अनुक्रमे अमरावती आणि मुंबई येथे घेतले. मुंबई विद्यापीठाच्या एमए व एलएल बी ह्या पदव्या मिळविल्यानंतर यवतामाळ येथे त्यांनी वकिली सुरू केली. १९४०पर्यंत ते ह्या व्यवसायत होते.

मुंबईस महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या कार्याने ते प्रभावित झाले होते. तो संस्कार बलवत्तर ठरून ते संशोधनकार्याकडे वळले. १९२६ साली यवतमाळ येथे 'शारदाश्रम' नावाची एक संस्था स्थापन करून त्यांनी संशोधन, संग्रहादी कार्यांसाठी सुविधा निर्माण केली. भारतभर संचार करून मठमंदिरांतून संस्कृत-मराठी ग्रंथ, ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ती, छायाचित्रे इ. ऐतिहासिक संशोधनाची साधने त्यांनी मोठ्या प्रमाणावर जमविली. प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासावर नवा प्रकाश टाकणारे अनेक शोधनिबंध त्यांनी लिहिले. 'शारदाश्रम' तर्फे निघालेल्या शारदाश्रम वार्षिकाचे (१९३३) ते संपादक होते. थिऑसाफिकल सोसायटी आणि प्राच्यविद्यापरिषद ह्यांच्या कार्यातही त्यांनी रस घेतला. १९३९ मध्ये झुरिक येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान त्यांना लाभला होता. ब्रूसेल्स येथे झालेल्या प्राच्यविद्यापरिषदेलाही ते गेले होते. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन ह्या संस्थेचे सन्मान्य सदस्यत्व त्यांना देण्यात आले होते.

महानुभाव पंथासंबंधी त्यांनी केलेल्या संशोधन-लेखनाबद्दल ते विशेष प्रसिद्ध आहेत. महानुभाव वाङ्मयाचा साकल्याने परिचय घडवून आणण्याच्या हेतूने त्यांनी महानुभावीय मराठी वाङ्मय (१९२६) हा ग्रंथ लिहिला. त्यासाठी केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर अगदी पंजाब, पेशावरपर्यंत त्यांनी प्रवास केला विविध महानुभाव मठांना भेटी देऊन आणि त्या पंथातील अनेक महंतांशी संपर्क साधून माहिती गोळा केली. महानुभावांचे अनेक ग्रंथही पाहिले. श्रीऋद्धिपुरवर्णन (१९२९), श्री चक्रपाणी-चरित्र (१९३६), पंडित भीष्माचार्यसंकलित निरूक्तशेष ह्यांसारख्या महानुभावीय ग्रंथाचे त्यांनी संपादन केले आहे. विदर्भातील ऐतिहासिक लेखांचा एक संग्रहही त्यांनी संपादिला आहे (१९५९). माझी शांती ही एक कादंबरीही त्यांनी लिहिली आहे.

१९४५ मध्ये नागपूर विद्यापीठात हस्तलिखित संग्रह करण्याची योजना डॉ. देशपांडे यांच्या प्रोत्साहनाने अस्तित्वात आली. त्यांनी वर्षभर विनावेतन, वर्हाड व त्याच्या बाहेर प्रवास करून सुमारे २००० हस्तलिखित ग्रंथ एकत्रित करून विद्यापीठाच्या स्वाधीन केले. त्यामुळे विद्यापीठात संशोधन वाङ्मयाच्या कार्याला चालना मिळाली. नागपूर येथे ते २० नोव्हेंबर १९७० रोजी निवर्तले. **(साभार : विश्वकोष मराठी व महाराष्ट्र नायक)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# गुळाच्या चहाचे पाच आरोग्यदायी फायदे

सध्या रस्त्यावर बघाल तिथे तुम्हाला 'गुळाच्या चहाची' टपरी दिसेल. आयुर्वेदामध्ये गुळाला गुणकारी म्हटले असून, गुळाचा चहा हा साखरेच्या चहापेक्षा फारच चांगला असतो असे सध्या म्हटले जाते आहे. त्यासाठी कारणदेखील तसेच आहे. गुळाचा चहा तुमच्या पचनासाठीदेखील उपयुक्त असतो. तुमची पचनशक्ती वाढवण्यास मदत करू शकतो. त्यासोबतच या चहातून मिळणारी उब ही तुमच्या शरीरातील थकवा दूर करण्याचेदेखील काम करते, असे वेबएमडीच्या एका लेखात लिहिले आहे, पण चहामध्ये साखरेऐवजी गूळ घालून पिण्याचे काही विशेष फायदेसुद्धा आहेत, ते नक्की कोणते आहेत ते बघूया.



**१. पचनासाठी उपयुक्त :** गुळाचा चहा पिण्याने अपचनाच्या समस्या दूर राहण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे गुळाच्या चहाने पचनक्रिया सुधारून, पोटाच्या अपचनाचा त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते.

**२. पाळीदरम्यान उपयुक्त :** मासिकपाळीदरम्यान गुळाचा चहा पिणे उपयुक्त ठरू शकते. गुळात असणाऱ्या पोषक घटकांमुळे व्यक्तीला अशा दिवसांमध्ये आराम मिळू शकतो. या काळात पोट दुखत असेल किंवा अस्वस्थ वाटत असेल तरीही गुळाच्या चहाचा उपयोग केला जाऊ शकतो.

**३. वजन कमी करणे :** गुळामध्ये पोटॅशिअम भरपूर प्रमाणात असल्याने चयापचयाची क्रिया ाशींरलेश्रळी सुधारून वजनावर नियंत्रण मिळवण्यास मदत होऊ शकते. म्हणजेच वजन कमी करण्यासाठीदेखील गुळाचा चहा उपयोगी ठरू शकतो.

**४. डिटॉक्स :** गुळाचा वापर शरीरातील अनावश्यक कचरा बाहेर काढण्यासाठी बॉडी डिटॉक्स केला जाऊ शकतो. गूळ हा नैसर्गिकरित्या श्वसनमार्ग, अन्ननलिका, पोट इत्यादी अवयवांची काळजी घेत असतो. त्यामुळे पोटातील अनावश्यक घटक शरीराबाहेर टाकून देऊन, गूळ पोटाचे आणि शरीराचे आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतो.

**५. प्रतिकारशक्ती वाढवणे :** गुळामध्ये असणारी जीवनसत्वे, खनिजे आणि पोषक घटकांमुळे सहाजिकच गूळ आपल्या शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यास मदत करू शकतो. म्हणून गुळाचे सेवन केल्याने आपले शरीर लहान-लहान त्रासांपासून आपला बचाव करण्यासाठी सक्षम होण्यास मदत होऊ शकते.

**(टीप : वरील लेख हा मिळवलेल्या माहितीवर आधारित असून कृपया यास वैद्यकीय सल्ला समजू नये.)**

# लांबलेल्या पावसाचा कडधान्य पिकाला फटका

## १३ हजार ७५० हेक्टरवर पेरणीचे नियोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदाच्या लांबलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला आहे. त्यामुळे या नुकसानीची थोडीफार भरपाई करण्यासाठी रायगड जिल्ह्यात आता कडधान्य लागवडीची लगबग सुरू आहे. जिल्ह्यातील शेतकरी ऑक्टोबर महिन्यानंतर कडधान्यांच्या लागवडीला अधिक प्राधान्य देतात, मात्र पावसाचा मुक्काम लांबल्याने शेतकऱ्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. सुमारे १३ हजार ७५० हेक्टरवर कडधान्य, तर तीन हजार ५०० हेक्टरवर भाजीपाला लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



जिल्ह्यात मुख्यत्वे करून वाल, हरभरा, मूग व मटकी यासारख्या कडधान्यांचे पीक घेतले जाते. अलिबाग, महाड, माणगाव, पोलादपूर या तालुक्यांमध्ये कडधान्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. पावसामुळे खरीप हंगामात झालेल्या नुकसानीनंतर आता रब्बी हंगामातील कडधान्य लागवडीवरही संकट आले आहे. खरीप हंगामातील भातशेतीचे मोठे नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहेत आणि आता त्यांना कडधान्य लागवडीच्या नियोजनातही अडचणी येत आहेत.

रायगड जिल्ह्यात गावठी वालाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. हे वाल टपोरे आणि रुचकर असतात. या गावठी वालांच्या शेंगांची चव आणि सुगंध खास असतो. त्यामुळे या वालांना अलिबागच्या प्रसिद्ध अशा 'पोपटी पार्टी साठी मोठी पसंती असते.यंदा पाऊस लांबल्याने अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक नियोजनावरही झाला आहे. त्यामुळे सरकारकडे मदतीची मागणी करूनही शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच आली आहे. भात पिकांच्या नुकसानीनंतर तरी कडधान्य लागवड करून आर्थिक नियोजन सांभाळण्याची कसरत चालू असतानाच जमीन ओलसर असल्यामुळे ही कडधान्य लागवडीमध्ये अनेक अडचणी येणार असल्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यातच भात झोडपणीची कामे अजून शिल्लक असल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवल्याचेही चित्र दिसून येत आहे.

> **ऑक्टोबर महिन्यापर्यंत पाऊस लांबल्याने अद्यापही भातकापणीची कामे पूर्ण झालेली नाहीत. जमीन ओली आहे. त्यामुळे कडधान्य पेरणी करण्यात अडथळे आहेत, मात्र शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करावा. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.**
> **–वंदना शिंदे,** जिल्हा कृषी अधिकारी अधीक्षक, रायगड

# मुरूड आगरी समाजाचा शिवसेनेला पाठिंबा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषद निवडणुकीत प्रचाराला वेग आला असून या निवडणुकीत शिवसेनेने( शिंदे) आघाडी घेतली आहे.मुरुड शहरातील आगरी समाजाने शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार कल्पना संदीप पाटील व सर्व नगरसेवक यांना आगरी समाजाने पाठिंब दिला आहे. त्यामुळे शिवसेनेचे प्राबल्य वाढले आहे.

मुरुड शहरात नगरपालिका निवडणूक जाहीर झाल्याने प्रचाराला वेग आला आहे ,शिवसेनेच्या नागराध्यक्षच पदाच्या उमेदवार कल्पना पाटील आणि सर्व नगरसेवक याना शहर आगरी समाजाचा पाठिंबा आहे असे समाजचे अध्यक्ष शशिकांत फुलारे यांनी जेष्ठ माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ यांच्या निवास्थानी झालेल्या सभेत सांगितले

त्यावेळी समाजाचे अशोक शहापूरकर संजू रोटकर ,संतोष भायदे,विजय शापूरकर घाटवाल, शहर प्रमुख संदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.आगरी समाजाच्या ४० महिला व ३० पुरुष मंडळींनी सभेला उपस्थीत होते . आगरी समाजाने पाठिंबा दिल्याने शिवसेनेच्या विजया बद्दल खात्री व्यक्त होत आहे.

# माणगाव नगरपंचायतीने महिला कर्मचाऱ्यांना कामावरून केले कमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीतील नऊ महिला कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबरपासून कोणत्याही प्रकारचे लेखी न देता केवळ तोंडी सांगून कामावरून कमी करण्यात आले होते. यापैकी पाच कर्मचाऱ्यांना काही दिवसांपूर्वी कामावर पुन्हा रुजू करून घेण्यात आले असून चार महिला कर्मचाऱ्यांना तुमचे काम असमाधानकारक असल्याचे सांगून कामावरून कमी करण्यात आले आहे. त्यांना कामावर घ्या; अन्यथा शिवसेनेतर्फे आंदोलन करण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी दिला आहे.


जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/म.प्र.१ दि. १८/१०/२०२३

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड ई–मेल :– eerid24@gmail.com

दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

**निविदा सूचना क्र. १६ सन २०२५–२६**

**महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई–निविदा सूचना व ई– निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. (Insurance & Royalty धरुन). | इसारा रक्कम रु. | काम पूर्ण करणेचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजनाला मध्यम प्रकल्पांतर्गत राजनाला डावा कालवा येथील साखळी क्रमांक किमी. ५ ते ७ मधील मोडकळीस झालेले अस्तरीकरण करणे, बांधकामे करणे व इतर अत्यावश्यक कामे करणे. | १,५३,८४,६२३/– | १,५०,०००/– | ०६ महिने | रु.२०००/– + रु.३६०/– २३६०/– (ना परतावा) | लागू नाही |
| २ | राजनाला पाली पोटल कालव्यावरील किमी ० ते १.५० मधील किमी ४ ते ८ मध्ये आवश्यक ठिकाणी नादुरुस्त अस्तरीकरण दुरुस्ती, पोहोच रस्ता दुरुस्ती भराव करणे. त्यावरील आवश्यक बांधकामे करणे, संरक्षक भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | १,५३,८४,७७६/– | १,५०,०००/– | ०६ महिने | रु.२०००/– + रु.३६०/– २३६०/– (ना परतावा) | लागू नाही |

**निविदा उपलब्ध कालावधी** : **दि. २०/११/२०२५ ते २७/११/२०२५**

**निविदा उघडण्याचा दिनांक** : **दि. २८/११/२०२५**

**खालील संकेतांक स्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in

२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.

३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.

४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता :– कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई–मेल eerid24@gmail.com

५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.

६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.

७. ई–निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

**टिप:– निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**सही/–**
**(इंजि. मिलींद पवार)**
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.

दिनांक : १९/११/२०२५

आरओसी–२०२५–२६ क्र.–५/सी–४१०४



**PANVEL MUNICIPAL CORPORATION, PANVEL**

**NOTICE INVITING TENDERS**

Online bids are invited from bidders to perform of the following work on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here-in-after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money (Rs.) | Cost of tender form (Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | Purchase of 10 nos. of Truck Mounted Road Sweeping Machines for daily cleaning of Roads in Panvel Municipal Corporation area including Operation & Comprehensive Maintenance of Road Sweeping Machines and Supplying Manpower for period of 5 Years. | 3.06 lakh | 3000/-+5% G.S.T. |

**Key Dates: -**

| Sr. No | Description | Date & Time |
|---|---|---|
| 1 | Publish Date | 20/11/2025 at 15:00 |
| 2 | Document Download Start Date | 20/11/2025 at 15:00 |
| 3 | Document Download End Date | 27/11/2025 at 15:00 |
| 4 | Pre-Bid Meeting | 24/11/2025 at 12:00 |
| 5 | Bid Submission start date | 20/11/2025 at 15:00 |
| 6 | Bid Submission end date | 27/11/2025 at 15:00 |
| 7 | Bid opening date | 28/11/2025 at 15:00 |

**SD/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**

दिनांक : १९/११/२०२५
जा.क्र. पमपा/धकवि/२५२५/प्र.क्र.१९२/७३४/२०२५


# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू जनजाती गौरवाची उपलब्धी –विनायक देशपांडे

**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आहेत. हा जनजातीचा गौरव आहे. आज आपला जनजाती बांधव नशेच्या आहारी जात आहे. छळ आणि प्रलोभनाला बळी पडून मूळ संस्कृती सोडून पर धर्मात जात आहे. धर्म टिकला तर संस्कृती आणि प्राचीन जनजाती सभ्यता टिकणार आहे. आपल्या जनजाती बांधवाना रामायण, महाभारत चा इतिहास आहे. आपण सर्वांनी संघटित राहून आपला समाज आणि धर्म टिकवण्यासाठी योगदान दिले पाहिजे. यासाठी आपण सर्व जण संकल्प करू या.' असे महत्वापूर्ण प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन मंत्री विनायक देशपांडे यांनी येथे केले.




बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंती निमित्त कर्जत तालुक्यातील पळसदरी येथील अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मठाच्या सभागृहामध्ये जनजाती गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात खोपोली फाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या स्मारक येथून प्रेरणा घेऊन मोटारसायकल रॅली काढून करण्यात आली. कातकरी समाजातील सांस्कृतिक नृत्याचे सादरीकरण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. जनजाती विश्र् हिंदू परिषदच्या कार्यकर्त्यांनी आपल्या कला कौशल्याने वातावरण निर्मिती केली.

जनजाती सुरक्षा मंच संयोजक कोकण प्रांताचे सुदाम पवार यांनी 'चिरनेर जंगल सत्याग्रह मध्ये हुतात्मा झालेले नाग्या कातकरी ह्यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून देताना छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या सैन्यातील जनजाती बांधवांच्या सहभाग आणि पराक्रम ह्यांची आठवण करून दिली.' प्राचीन काळापासून जनजाती बांधव भारत भूमिचे आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण करत आले आहेत.भगवान बिरसा मुंडा, हुतात्मा नाग्या कातकरी, राणा पुंजा भिल, राणी, सिद्धू कानू, फुलो जाणो आशा अनेक जनजाती वीर – वीरागणांच्या पराक्रमाचे स्मरण जनजाती जाती गौरव निमित्त करून दिले.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५**
**प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सूचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा– २०२५/प्र.क्र. ४१/का. ५, दि. १३/११/२०२५ अन्वये पनवेल महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषित केला आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु/पुर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रभाग निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि.२०/११/२०२५ |
| २ | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि.२७/११/२०२५ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणीत करुन प्रसिध्द करणे. | दि.०५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे. | दि.०८/१२/२०२५ |
| ५ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.१२/१२/२०२५ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील कलम ७ अ च्या तरतूदीन्यये, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या १८८–पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांवरुन पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारुप मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत व त्या मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये आज दिनांक २०/११/२०२५ रोजी खालील नमूद ठिकाणी त्यासमोर नमुद निवडणुक प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या माहितीसाठी आणि निरीक्षणासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्र. |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती अ अंतर्गत उप विभाग नावडे | १,२,३ |
| २ | प्रभाग समिती अ कार्यालय, खारघर | ४,५,६ |
| ३ | प्रभाग समिती ब कळंबोली | ७,८,९,१० |
| ४ | प्रभाग समिती क कामोठे | ११,१२,१३, |
| ५ | प्रभाग समिती ड पनवेल | १४,१५,१६,१७,१८,१९,२० |

तसेच, प्रस्तुत १ ते २० प्रभागांच्या प्रारुप मतदारयाद्या www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईटवर व निवडणूक विभाग, मुख्यालय, पनवेल महानगरपालिका, गोखले हॉलजवळ येथे निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

१. सदरील प्रारूप मतदार याद्यांवर कोणाच्या हरकती अगर सूचना असल्यास त्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे सर्व संबंधित प्रभाग कार्यालय, पनवेल महानगरपालिका मुख्यालय येथे दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत दाखल करता येतील.

२. हरकती व सूचना सादर करण्याचे विहित नमुने पनवेल महानगरपालिका मुख्यालय, तसेच प्रभाग समिती कार्यालये व महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विहित नमुन्यातच हरकती/सूचना / तक्रारी स्विकारल्या जातील, याची नोंद घ्यावी.

३. कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रीत यादीच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.

४. मुदतीनंतर आलेल्या हरकती/सूचना स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण :– पनवेल
दिनांक :– १९/११/२०२५

**स्वाक्षरी**
**(मंगेश चितळे)**
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.६०८/६२९/२०२५



**पा हि जे त**

**पनवेल मधील मालवणी हॉटेलसाठी १२ वी पास मुले सुपरवायझर/कॅशिअर व वेटर पाहिजे, पगारा सोबत राहण्याची–जेवणाची सोय.**

**संपर्क : ८१०४४५३१६४/९८६०७७८१५३/८२९१७३४९३३**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – अरिवली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ११८ | ०–०५–८० पो.ख. ०–०१–०० **एकूण ०–०६–८०** | १.०० | शिवाजी नारायण लखांबले सुभाष बाळाराम लखांबले सुरेखा निलेश दाभणे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १९/११/२०२५.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड मो. क्र. : ९९३०३६९८६१



**BEFORE THE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, SURAT.**

(R.K.Modh Saheb, 12TH A.D.J., SURAT, GUJARAT)

Room no.319, 3rd Floor, Athwalines, New Court Building, Surat, Gujarat

M.A.C.P.NO.211/2022
Ex.

**Applicant - 1) Leenaben Anilbhai Gamit & Others**
Resi.at- 106, Asharamji Nagar, Variyav, Opp C.J.College, Surat
(Advocate R.B.Soni)

**Versus**

**Opponent No.1- ALGEE LOGISTICS PVT LTD.**
Resi. at- Plot No.1781,1782 Road No.22, Sector Panvel, Raigarh, Maharashtra - 410206

You, Opponent No.2 is hereby informed by this Public Notice that the Truck No. GJ-15-av-2201 with ownership of opponent no.1, met an accident with Applicant's on 18th February, 2022 at 19.45 in the Evening near Jahangirpura in range of Jahangirpura police station. In the said accident Applicant's husband sustained serious injuries and died. Hence Applicant is file above petitions to get Compensation of Rs.8,00,000/- main petition.

You, the Opponent No. 1 inspite of repeated process of notice byCourt and by R.P.A.D. are not served, hence by this notice you are informed that you the **Opponent No.1 must remain present before the Motor Accident Claim Tribunal (Main), Surat, On 30th December, 2025 at 10:30 a.m.** personally or through Advocate under your instructions, failing which the same will be treated as your absence and the said application for Compensation shall be proceed ex-party and disposed off accordingly which, please note.

Signed and Sealed today on this **18th day of November, 2025** under my hand and Seal of the Court.

Court Seal

| Prepared by, | Compared By, | |
|---|---|---|
| **Sd/-** | **Sd/-** | **Sd/-** |
| Mr.R.H.Galchar | Mr.C.D.Kokas | (L.V. Parekh) |
| (Assistant) | (Supritendent) | Registrar |
| 12th Add.District Court, Surat | 12th Add.District Court, Surat | MACP Branch, Surat |

# नव्या उड्डाणपुलांसाठी एमआयडीसीला साकडे

## नवी मुंबई महापालिकेचा ४०० कोटींचा प्रस्ताव



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाहनांच्या वाढत्या भारामुळे गेल्या काही वर्षांपासून मुंबई महानगर प्रदेशातील वर्दळीच्या मार्गांमध्ये गणला जाणाऱ्या ठाणे-बेलापूर रस्त्यावरील तीन नव्या उड्डाणपुलांच्या खर्चाचा अर्धा भार महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने उचलावा अशा स्वरुपाचा प्रस्ताव नवी मुंबई महापालिकेने महामंडळाला सादर केला आहे. नव्या पुलांसाठी ४०० कोटी रुपयांची तजवीज महामंडळाने करावी अशी मागणी महापालिकेने केली आहे.

एमआयडीसीने अंगिकारलेल्या नव्या धोरणानुसार ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर नागरी संकुलांची उभारणी सुरू झाली आहे. एमआयडीसी पट्ट्यातील या नागरी आणि व्यावसायिक संकुलांचा मोठा भार ठाणे-बेलापूर रस्त्यावर येणार आहे. तसेच तुर्भे ते दिघा-ऐरोली दरम्यान उभारण्यात आलेल्या ठाणे-बेलापूर मार्गावर गेल्या काही वर्षात वाहनांचा भार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यास लागून हा मार्ग असल्याने या भागातील वाहनांचा मोठा भार या रस्त्यावर येत असतोच.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यामुळे येत्या काही वर्षांत या ठिकाणी येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे ठाणे-बेलापूर मार्ग अधिक वर्दळीचा होईल हे स्पष्ट आहे. उरण येथील जवाहरलाल नेहरू बंदरात येणाऱ्या अवजड वाहतुकीचा भारही सद्यस्थितीत या मार्गावर येत असतो. याशिवाय वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबईतील वेगवेगळ्या उपनगरांमधील अंतर्गत वाहनांमुळे हा मार्ग सतत गजबजलेला असतो.

नवी मुंबई विमानतळ तसेच एमआयडीसी भागाचे होणारे विस्तारीकरण लक्षात घेता ठाणे-बेलापूर मार्गावर पडणारा वाहनांचा हा भार लक्षात घेता नवी मुंबई महापालिकेने या मार्गावर आणखी नव्या उड्डाणपुलांची उभारणी करण्याचा निर्णय घेतला आहे. रबाळे स्थानक, वनमंत्री गणेश नाईक यांचे कार्यालय असलेल्या क्रिस्टल हाऊस ते पावणे आणि तुर्भे येथील बीएसएफ कंपनीपासून शीव-पनवेल महामार्गावर सानपाडा भागात असलेल्या शरयू हुंडाई शोरुम पर्यत असे तीन नवे उड्डाणपूल उभारले जाणार आहेत. यासाठी महापालिकेला अंदाजे ८०० कोटी रुपयांचा खर्च करावा लागणार आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता हा खर्च करणे शक्य आहे. या खर्चाचा भार एमआयडीसीने उचलावा असा प्रस्ताव महापालिकेने तयार केला आहे.

### औद्योगिक भूखंडावर निवासी संकुलांची बांधणी

*एमआयडीसीच्या नव्या धोरणानुसार सध्या औद्योगिक पट्ट्यातही घरबांधणी जोरात सुरू झाली आहे. ठाणे-बेलापूर मार्गास लागूनच असलेल्या मोठ्या औद्योगिक भूखंडांवर आता निवासी आणि व्यावसायिक संकुलांच्या रांगा दिसू लागल्या आहे. देशातील एका मोठ्या उद्योजकाच्या माहिती तंत्रज्ञान संकुलात आता नागरी वसाहती आणि मोठे मॉल्स उभे राहू लागले आहेत. या वापर बदलामुळे मोठ्या एमआयडीसी भागातही मोठया प्रमाणावर लोकसंख्या वाढणार आहे. लोकसंख्या वाढीचा हा भार ठाणे-बेलापूर पट्ट्यावर येण्याची शक्यता आहे. एमआयडीसीच्या नव्या विस्तार धोरणामुळे ठाणे-बेलापूर मार्गावर येणारा वाहनांचा ताण लक्षात घेता महापालिकेने हा प्रस्ताव सादर केला आहे.*

**नव्या उड्डाणपूल प्रकल्पांची आखणी आतापासूनच होणे गरजेचे आहे. एमआयडीसीत नव्याने उभी रहाणारी घरे, व्यापारी संकुलांचा मोठा भार या रस्त्यावर येणार आहे. त्यामुळे या उड्डाणपुलांचा खर्च एमआयडीसीने उचलावा असा प्रस्ताव महापालिकेने त्यांना सादर केला आहे. यासंबंधीचे एक पत्र नुकतेच एमआयडीसीला पाठविण्यात *आले आहे.***

**-डॉ.कैलास शिंदे,** ***आयुक्त नवी मुंबई महापालिका***

# तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर मनपाची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागा अंतर्गत सानपाडा गाव तलावाजवळ रेल्वे पटरीलगत व सानपाडा, सेक्टर २०, एसटीपी प्लांट जवळ अनधिकृत झोपडया हटविण्यासाठी १४ व १८ नोव्हेंबर रोजी तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

त्यानुसार, कारवाई करून अंदाजे ७५ अनधिकृत झोपडया हटविण्यात आलेल्या आहेत.सदर मोहिमेसाठी तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी, सागर मोरे, तुर्भे विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षकदेखील तैनात ठेवण्यात आले होते.

अनधिकृत हटविण्याकरीता हटविण्याकरीता ०१ जे.सी.बी., २० मजूर यांचा वापर करण्यात आला आहे. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.



**पनवेल : शिवाजीनगर अकॅडमीच्या असोसिएशनचे रजिस्ट्रेशन झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सेक्रेटरी राजेश पाटील, खजिनदार सुदीप ठाकूर, सहखजिनदार सुदेश ठाकूर आदींनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल.ठाकूर, न्हावा ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, ज्येष्ठ नेते अरुण ठाकूर आदी उपस्थित होते. सर्वांनी अकॅडमीच्या रजिस्ट्रेशनबद्दल आनंद व्यक्त केला.**

# श्रीमद्‌भगवद्‌गीता पठण स्पर्धेसाठी ७९ स्पर्धक अंतिम फेरीसाठी पात्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका, संस्कारभारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्रीगुरुकुलम न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रीमद्‌भगवद्‌गीता पठण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये परिसरातील स्पर्धकांनी मोठा सहभाग नोंदवत प्राथमिक यशस्वी केली. यामधून ७९ स्पर्धक अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेली श्रीमद्‌भगवद्‌गीता पठण स्पर्धा प्राथमिक फेरी शालेय आणि खुला अशा दोन गटांमध्ये झाली. यामध्ये ३०हून अधिक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शालेय गटातील स्पर्धा चार केंद्रावर झाली. या प्राथमिक फेरीत ७९ स्पर्धक अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

यामध्ये गट अ तिसरी ते चौथीमध्ये साई तुळशीराम गंडाळ, भाविका ओंकार कुलकर्णी, श्रावण सुनील पवार, रितिका अमोल पाटील, ऱ्हितीका प्रितेश जैन, धैर्य वैभव बांठिया, शिवम निवास डांगरकर, तस्मय तुषार जाधव, ऱ्हिदया पंकज पाटील, नावन्या मंगेश वामन, शुभ्रा विनित जोशी, देवश्री कैलास जाधव, तनया सिद्धेश पराडकर, वेदा समीर तांबडे, आराध्या अभिषेक पटवर्धन, मित निलेश कुंभार तर गट ब पाचवी ते सातवीमध्ये रिद्धि राकेश मांडविया, जान्हवी पुरुषोत्तम गोंधळी, शुभ्रा सुनील गोंधळी, स्पृहा देवेन मराठे, अथश्री सारंग जोशी, ईश्वरी नरेंद्र कट्टी, विहान विवेक सोनवणे, वृद्धी राकेश मांडविया, राधा अंबरिश सहस्त्रबुद्धे, मृणाली नितीन फराड, मृगांक भुषण कुलकर्णी, अक्षित शांताराम बेडेकर, स्वरा समीर तांबडे, श्लोक अभय म्हात्रे, वैष्णव शारंगधर पाटील, भावार्थ रोशन घरत, श्री दर्शन काब्रा, ऐशानी हरेश नागोठकर, साक्षी झवर, प्राजक्ता हेमंत जोशी, ईशा रूपेश पाटील, मृणाल प्रदीप फडके तसेच गट क आठवी ते दहावीमध्ये परि भुषण कुलकर्णी, आभा सुजित टिळक, अनुश्री महेश जोशी, विद्यारण्य सचिन गोंधळी, शताक्षी आनंद दशपुते, शांभवी रिशिकेष काळे, पुर्वा भालचंद्र कुरुंगळे, वेदांगी केशव करंदीकर, अर्जित अनिकेत खोटे, युवराज अनिल गोंधळी, रिधित आशिष चोपडे, अक्षरा साहु, शार्दुल सचिन जाधव, स्वर्णिम प्रिया झा, दक्ष निवृत्ती ठोंबरे, लोभस देवेंद्र म्हात्रे, मयांक महेश म्हामुणकर, कस्तुरी संदीप पाटील, प्रज्ञेश योगेश लबडे, शर्वरी नितीन जाधव, काव्या अजय कोरडे, तन्मय अनिल पोपेटा, आयुष संदेश म्हात्रे, ध्रुव हितेंद्र सुपे, कैवल्य भारतभुषण पाटील, वेदांत आशिष रणखांबे, सिद्धाक शशिकांत जाधव, आराध्या संदीप भोसले, परिधी महेश पाटील, नेत्रा सोपान शेडगे, भक्ती सचिन खरात, लता राजु जाधव आणि खुला गटामध्ये मुग्धा जयंत कुलकर्णी, गुरुनाथ बाळकृष्ण काठे, निवेदिता मधुकर नाईक, शैला शारदराव कन्नडकर, निता लक्ष्मण भुजबळ, वृषाली विद्यारण्य क्षीरसागर, श्रुती संदीप गिरकर, रचना राजन जोशी मनिषा देव यांचा समावेश आहे.

दरम्यान, लवकरच अंतिम फेरी होणार आहे. त्यामध्ये प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार असून विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# पटेल हॉस्पिटलमध्ये रोबोटद्वारे शस्त्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील पटेल हॉस्पिटल मध्ये डॉ. कुणाल मखिजा यांनी रोजा रोबोटद्वारे ५०० गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गेल्या दोन वर्षात पूर्ण केल्या आहेत. पटेल हॉस्पिटल पनवेल हे रोजा रोबोटिक द्वारा गुडघ्याची ५०० सर्जरी करणारा महाराष्ट्र मधला पहिला हॉस्पिटल झाला आहे. सव्वा पाचशे ते साडेपाचशे लोकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे.

ही शस्त्रक्रिया ७०, ८०, ९० किलोमध्ये पण करू शकतो आणि १२० ते १४० किलो वजनाच्या रुग्णावर पटेल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. गुडघ्याची शस्त्रक्रिया खूपच कॉमन झाला आहे. पटेल हॉस्पिटलमध्ये पनवेल येथील ग्रामीण विभागातून रुग्ण गुडघ्याच्या रोबोटिक सर्जरीसाठी आले आहेत.

रुग्णालयात रोबोटिक सर्जरीसाठी पेण, रायगड, थला, मंडणगड, म्हसळा, सांगली, सांगोला, विटा, सोलापूर, पंढरपूर, कोल्हापूर, युपी, बिहार, दुबई आणि बांगलादेशहुन रुग्ण आले आहेत. शस्त्रक्रिया झालेले सगळेच रुग्ण प्रसन्न आहेत, कारण याचे रिझल्ट खूपच चांगले आहेत. सामान्य माणसालासुद्धा ही शस्त्रक्रिया परवडते.

शस्त्रक्रिया इन्शुरन्स मध्येपण कव्हर होतो आणि सामान्य माणसाला जे नॉर्मल गुडघ्याची प्रत्यारोपण आहे तेवढेच पैसे घेत असून रोबोटचे वेगळे एक्स्ट्रा पैसे चार्ज करत नसल्याचे डॉक्टर कुणाल माखिजा यांनी सांगितले.




# कर्मचारी नसल्याने निबंधक कार्यालयातील कामांचा खोळंबा

**नवी मुंबई : बातमीदार, वार्ताहर**

सह निबंधक, उप निबंधक व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई येथील कायर्यालयात कामकाजासाठी आवश्यक कर्मचारी उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक सोसायट्यांच्या कामांचा खोळंबा झालेला पाहायल मिळत आहे. याविषयी नवी मुंबई को ऑपरेटिव्ह हाउसिंग फेडरेशनकडे अनेक सोसायट्यांनी कामे वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या.

याबाबत माहिती घेतल्यावर सहनिबंधक कार्यालयात मनुष्यबळाची कमी असल्याचे आढळून आले आहे. याबाबत नवी मुंबई को. ऑपरेटिव्ह हाउसिंग फेडरेशनने सहकार मंत्रालयाच्या पणन विभाच्या प्रधान सचिव, सहकार आयुक्त तसेच सिडको एमडीना पत्र देऊन मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

नवी मुंबई, पनवेल व उरण परिसरातील खासगी तसेच सिडको सोसायट्यांसाठी नवी मुंबई को ऑपरेटिव्ह फेडरेशन काम करत असते. फेडरेशन सह निबंधक कार्यालय व सोसायट्यांमध्ये दुवा म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे सहनिबंधक कार्यालयात अडचणी असल्यास त्याबाबत फेडरेशनकडे कायदेशिवायक अथवा तांत्रिक बाबींसाठी सोसायट्या दाद मागता असतात. गेल्या १५ दिवसांत अनेक सोसायट्यांनी सहनिबंधक कार्यालयात कामे वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार फेडरेशनने याबाबत सहनिबंधक कार्यालयाकडून माहिती घेतली असता

कर्मचारी नसल्याने सुनावणी, निवडणूक प्रक्रिया तसेच पत्रव्यवहार यासंबंधीचे कार्य ठप्प झाले आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक व संस्थाना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपल्याच अखत्यारीतील सहनिबंधक कार्यालयात मनुष्यबळ वाढवावे, अशी मागणी करणारे पत्र नवी मुंबई फेडरेशनने शासनाला दिले आहे.

# तुर्भे नाका हनुमान नगरमध्ये नागरी सुविधा देण्याची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे नाका येथील हनुमान नगर मधील नागरिकांना नागरी सुविधा मिळाव्यात म्हणुन हनुमान नगर रहिवाशी विकास कृती समितीच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

हनुमान नगर रहिवाशी विकास कृती समितीचे अध्यक्ष प्रदिप बी. वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आलेल्या निवेदनात हनुमान नगर मधील नागरिकांना भेडसावणाऱ्या मागण्या सोडवण्या संदर्भात विनंती करण्यात आली आहे. दरदिवशी परिसरात साफ-सफाई करण्यात यावी, अवेळी येते असलेला पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा, शेजारी असणाऱ्या डम्पिंग ग्राउंडचा नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असून त्यावर योग्य उपाय योजना करण्यात यावी, फुटपाथ अतिक्रमण मुक्त करण्यात यावे, अनिधिकृत मोबाईल टॉवर हटवण्यात यावे, मस्जिदच्या मागील मोकळ्या जागेत मुलांना खेळण्यासाठी मैदान विकसित करण्यात यावे अशा विविध मागण्याची सोडवणूक करण्यात यावी, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, निवेदन अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांनी स्वीकारले. आयुक्त यांच्याशी चर्चा करून निवेदनातील मागण्या लवकरात लवकर सोडवण्यात येतील असे आश्वासन डॉ. कैलास गायकवाड यांनी शिष्टमंडळास दिले. निवेदन देण्यासाठी प्रदिप वाघमारे यासह विनोद वानखेडे, गणेश कोळी, साजिद शेख आदी पदाधिकारी उपस्थिती होते.

# औषध सुरक्षितता सप्ताह उत्साहात

## कामोठे, खांदा कॉलनीमध्ये जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या औषध माहिती केंद्राच्या माध्यमातून राज्यभर मेडी सेफ्टी विक उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीची मुख्य संकल्पना रिपोर्टिंगमुळे औषधे अधिक सुरक्षित होतात. अशी होती त्यानुसार जनजागृती आणि प्रबोधन करण्यात आले. पनवेल परिसरात कामोठे आणि खांदा कॉलनी अशा प्रकारचे चर्चासत्र घेण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रभर जनजागृती करण्यात आली.



उपक्रमामध्ये परिषदेच्या औषध माहिती केंद्र उपसमिती अध्यक्ष गणेश बंगाळे यांनी भारतीय औषध परिषदेचे प्रतिनिधी जगन्नाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली औषध सुरक्षिततेचे संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा विशेष प्रयत्न केला गेला.

या मोहिमेअंतर्गत ५० हून अधिक फार्मसी प्राध्यापक आणि समन्वयक यांना आरोग्य क्षेत्राबाहेरील संस्था, महाविद्यालये, उद्याने, बसस्थानके, जिम, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी जनजागृती सत्रे घेण्याचे आवाहन करण्यात आले. राज्यभर तब्बल ४१० सत्रे घेण्यात आली. यामध्ये औषधांचा सुरक्षित वापर, दुष्परिणाम, अहवाल नोंदविण्याची पद्धत, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी फार्मासिस्टची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे ३०,००० पेक्षा जास्त नागरिक औषधांचा सुरक्षित वापर, सुरक्षित साठवणूक, दुष्परिणाम नोंदवण्याची पद्धत याबाबत शिकले. या मोहिमेत सहभागी सर्व समन्वयक आणि प्राध्यापकांना महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

उपक्रमाचे संपूर्ण संयोजन औषध माहिती केंद्राच्या तांत्रिक सहाय्यक डॉ. विनया कुलकर्णी आणि भूषण माळी यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.परिषदेचे अध्यक्ष अतुल अहिरे म्हणाले, महाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत औषध सुरक्षिततेचा संदेश पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. या मोहिमेचे यश फार्मासिस्ट शिक्षक आणि जनसामान्य यांच्या सहकार्याचे फलित आहे. परिषदेच्या निबंधक सायली स्वनिल मसाल यांनी मोहिमेचे मार्गदर्शन केले.

या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील नागरिकांना औषधांचा तर्कसंगत आणि सुरक्षित वापर करण्यास प्रोत्साहन देणे, फार्मासिस्टचा सक्रीय सहभाग वाढवणे आणि औषध सुरक्षा संस्कृतीला बळकट करणे हे उद्दिष्ट साध्य झाले असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# मधुबन कट्ट्याचे १२१वे बहारदार कविसंमेलन

**उरण : रामप्रहर वृत्त**

दर महिन्याच्या १७ तारखेला होणारे उरण कोमसापचे मधुबन कट्ट्यावरील १२१ वे कवी संमेलन नुकतेच संपन्न झाले. कवी संमेलनाचे अध्यक्ष स्थान लायन्स क्लब ऑफ उरणचे अध्यक्ष प्राचार्य साहेबराव ओहोळ यांनी भूषविले होते.

या वेळी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य साहेबराव ओहोळ यांनी अजब दुनिया माणसांची या विषयावर ज्या कविता कवींनी सादर केल्या. त्या कविता मानवी वृत्तीवर आणि शासकीय व्यवस्थेवर आसूड ओढणाऱ्या व मानवी संवेदना जाग्या करणाऱ्या असल्याचे त्यांनी भाषणातून सांगितले.

रायगड भूषण प्राध्यापक एल.बी. पाटील यांनी आपल्या कवितेमधून जवळपास १७ प्रकारच्या मानवी प्रवृत्तीवर प्रकाश टाकला. तर उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी आपल्या मजल या काव्य प्रकारातून सादर केलेली काही माणसे ही मजल रसिक वर्गाला खूपच भावली.

कवी संमेलनात अजय शिवकर, हेमंत पाटील, अनामिका राम, संजीव पाटील, समता ठाकूर, दर्शन मोकल, मारुती तांबे, रामचंद्र म्हात्रे, नरेश पाटील या सर्व कवींनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उत्तर भागात वंदना म्हात्रे (गोवठणे) यांना शैक्षणिक सेवेबद्दल तर जीवन पाटील (भाकरवड) यांना सामाजिक सेवेबद्दल जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमास देविदास पाटील, रंजना केणी, सुरेश मेस्त्री, चंद्रकांत मुकादम, दत्ताराम नीलवर्ण, सुरेश शिंदे, सुरेश गायकवाड, विकास पूरो, भुवनेश्वर पाटील, शंकर पाटील या मान्यवरांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. संजय होळकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



# रेवदंडा एसटी बसस्थानकाची दुरवस्था

## अपघातास निमंत्रण; उपाययोजनेची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रवासीवर्गाचे जिव्हाळ्याचे असलेले रेवदंडा एसटी बसस्थानक आवारात पडलेले मोठे खड्डे व स्थानकांच्या आवारात बेशिस्तीने केलेली वाहन पार्किग यामुळे अपघातास निमंत्रण ठरते, भविष्यात आवारात सर्वत्र पडलेले मोठे खड्डे व बेशिस्त अनाधिकृत वाहने

पार्किंग स्टँड यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता संभवते. रेवदंडा एसटी बस स्थानक अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे, नित्याने तिन्ही तालुक्यात येथून एसटी बसेस जा-ये करत असतात. येथूनच मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी, आदी महाराष्ट्रात मुरूड एसटी डेपोच्या दुरवर जात असलेल्या एसटी बसेस थांबा आहे. या एसटी बस स्थानकांत प्रवासीवर्ग व स्थानिकांचे वर्दळ असल्याने नित्याची गर्दी आढळते.



रेवदंडा एसटी बस स्थानक आवारात पावसाळयात मोठे मोठे खड्डे निर्माण झाले होते, या खड्डात पावसाळयात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. सध्या पावसाला नसल्याने खड्डयात पाणी नाही, मात्र भले मोठे खड्डे तसेच आहेत, स्थानकांच्या आवारात एसटी बसेस ये-जा करत असताना या खड्डाने बसेस मधील प्रवाशाना धक्का बसतो, तसेच खड्डे चुकविताना वाहन चालकांची सुध्दा भंबेरी उडते. या वेळी स्थानकांच्या आवारातील प्रवाशीवर्ग अथवा स्थानिक यांना बसेस चालकांचे खड्डे चुकविण्याचे प्रयत्नात धक्का लागून अपघात होण्याची निश्चित शक्यता संभवते. त्यामुळे भविष्यात एस.टी.स्थानकांचा आवारात खड्डे चुकविताना अपघातास निमत्रंण ठरत आहे.

शिवाय एसटी स्थानक आवारात बेशिस्तीने लहान मोठी वाहने अनाधिकृतपणे पार्किग नित्याची असते. या अनाधिकृत पार्किगने एसटी बसेस ये-जा करताना अडथळा होत असतो. खड्डे व बेशिस्त पार्किग यामुळे रेवदंडा एसटी बस स्थानकांस निश्चितपणे अपघातास निमत्रंण ठरत आहे.

बस स्थानक आवारातील रस्ता संबंधितांनी पुनस्यः करावा, अशी मागणी पावसाळयापासून प्रवासीवर्ग करत आहेत, मात्र संबधीत बस स्थानक आवारातील रस्त्याची दुरावस्था दुर्लक्षीत करत असल्याने प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थ संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

# लांबलेल्या पावसाने कडधान्ये पिके लांबणीवर; शेतकरी हवालदिल

**माणगाव : प्रतिनिधी**

ऋतुमानानुसार पीक घेण्याची परंपरा असलेल्या रायगड जिल्ह्यात विविध हंगामात वेगवेगळी पिकं घेतली जातात. पावसाळा, हिवाळा व उन्हाळ्यातील विविध पिकासाठी रायगड प्रसिद्ध आहे.

जून ते सप्टेंबर महिन्यात भाताचे पीक, हिवाळ्यात विविध कडधान्य पीक तर हिवाळा-उन्हाळ्यात विविध भाजीपाला व कलिंगड आदी पिकं जिल्ह्यात घेतली जातात. गेले कित्येक वर्षे हे चक्र सुरू आहे. जूनला सुरू झालेला पावसाळा सप्टेंबर अखेर परतीला लागतो व ऑक्टोबर महिन्यात हिवाळी शेतीची कामे सुरू होतात. यावर्षी मात्र ऑक्टोबर महिना संपत आला तरी पावसाने उघडीप दिली नाही. सतत पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांची कापणी सह सर्वच कामे रखडली आहेत.



ऑक्टोबर महिन्यात कडधान्ये शेतीची लागवड केली जाते.

काही शेतकरी भात कापणीपूर्वी वाल, मटकी इत्यादी कडधान्य शेतात पेरतात. पाऊस जाईल या आशेवर काही शेतकऱ्यानी शेतात कडधान्ये पेरली होती, मात्र सततच्या पावसाने पेरलेले बियाणे सुद्धा वाया गेले आहे. हिवाळी पिकांसाठी आवश्यक असलेले

**ऑक्टोबर महिन्यात कापणी पूर्वी कडधान्ये पिकांची पेरणी करतो. योग्य ओलाव्यामुळे ही पिके बहरात येतात. यावर्षी मात्र पावसाने अजून उघडीप दिली नाही. त्यामुळे पेरणी कधी करायची व रुज कधी व कशी होईल हा प्रश्न निर्माण झाला आहे. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये पेरणी केल्यास त्याची वाढ होणार नाही.**

-वैशाली पडवळ, माणगाव

वातावरण न मिळाल्यास या पिकांवर लक्ष ठेऊन असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. भातशेतीचे पावसाने अगोदरच नुकसान केले असताना हिवाळी शेतीही लांबलेल्या शेतकऱ्यांना मोठी चिंता लागून राहिली आहे.

# खोपोलीतील कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलमध्ये विज्ञान-संस्कृती महोत्सव

**खोपोली : प्रतिनिधी**

कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, खोपोलीत प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही विज्ञान, भाषा, संस्कृती, इतिहास आणि खेळ यांना समर्पित भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विविध कल्पनाशक्ती, कौशल्य आणि उपक्रमांनी सजलेले हे प्रदर्शन सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.



यातील विशेष आकर्षण ठरली ती स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्याची भव्य प्रतिकृती. तब्बल चार फूट उंच आणि वीस फूट लांब असलेली ही दिव्य प्रतिकृती पाहणाऱ्यांना मंत्रमुग्ध करणारी ठरली. रायगडाचे शिल्पवत सौंदर्य जपून तयार केलेली ही भव्य प्रतिकृती साकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. चित्रकला आणि हस्तकलेचे दालनदेखील वैविध्यपूर्णरीत्या सजवले होते.

शाळेच्या लोकल मॅनेजर सिस्टर जुली मारिया, मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, उपमुख्याध्यापिका सिस्टर आयविन यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वांगीण प्रदर्शन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी खेळांच्या विविध साहसी प्रकार, तसेच खाण्यापिण्याचे स्टॉलदेखील आकर्षक पद्धतीने उभारले होते. प्रदर्शनाला पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत भेट दिली.

विशेष म्हणजे, समाजिक बांधिलकी जपत प्रदर्शनादरम्यान शिक्षकवर्ग व पालकांनी रक्तदान करून सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले. सर्व क्षेत्रांचा सुंदर संगम असलेल्या या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव मिळवून देत कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलची उपक्रमशीलता अधोरेखित केली.

# आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात नशामुक्त महाराष्ट्र शपथ

**नागोठणे : बातमीदार**

येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१८) नशा मुक्त अभियानांतर्गत नशामुक्तीची विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दिनेश भगत यांनी विद्यार्थ्यांना नशा मुक्त महाविद्यालय ठेवण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयात तंबाखू, गुटखा व अन्य नशायुक्त पदार्थ विकण्यास व बाळगण्यास प्रतिबंध असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना नशा मुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ.संदेश गुरव, प्रा. डॉ. विजय चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोहर शिरसाठ, डॉ.विलास जाधवर, प्रा. हेमंत जाधव, प्रा. निलम महाले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



# इनरव्हील क्लब खोपोलीतर्फे विविध सामाजिक उपक्रम




**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब खोपोली तर्फे विठ्ठल मंदिर साजगाव येथे एकादशीनिमित्त गरजू व गरीब नागरिक, महिला, व लहान मुले यांच्या साईजचे कपडे, ज्वेलरी, चपल, बॅग, कंबल स्वेटर अशा वस्तू दान करण्यात आल्या.

जवळपास १५० गरजू लोकांनी ह्याचा लाभ घेतला, तसेच खोपोली रेल्वेस्टेशन येथे व्हील चेअर डोनेट केली ही व्हीलचेअर धुंडाजी हडप यांनी इनरव्हिल क्लब खोपोलीला दिली होती.

या कार्यक्रमावेळी खोपोली रेल्वेचे चीफ कमर्शियल इन्स्पेक्टर शिरीष कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष दिना शहा सेक्रेटरी मधुमिता पाटील, श्रीदेवी, सुनंदा गांधी, सुमन, दीपिका श्रीवास्तव, राजेश्री पाटील, ज्योती शिंदे, दिव्या मश्रु, डॉ.सावित्री रघुपती, क्षमा आठवले, डॉ. अर्चना जाखोटिया, नाज, सुमित्रा महर्षि, तारा नायडू या सदस्य उपस्थित होत्या.

# पेणमध्ये संघटित, संघटित कामगार युनियनची कार्यकारिणी जाहीर



**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये श्री महाकामगार संघटित व असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य कामगार संघटनेची नव्याने कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या वेळी पेण नाक्यावर कोतवाल चौकात फलकाचे अनावरण करण्यात आले.

या वेळी युनियनच्या अध्यक्षपदी महेंद्र कोळी, उपाध्यपदी यशवंत पाटील, नामदेव पिंगळसकर, चिटणीसपदी राकेश पाटील, सरचिटणीसपदी गणेश म्हात्रे, दत्तात्रेय पाटील, खजिनदारपदी वसंत म्हात्रे, सहखजिनदार दिपक बामणे, गोविंद चव्हाण व कायदेशीर सल्लागारपदी अविनाश पाटील यांची निवड करण्यात आली.

या वेळी युनियनचे अध्यक्ष महेंद्र कोळी म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपूर्वी युनियनची स्थापन झाली आहे. सध्याची परिस्थिती पाहता आता युनियनच्या माध्यमातून प्रत्येक कामगार सदस्याला त्याच्या कामानुसार रेट ठरविण्यात आले असून जो कोणी कमी रेट घेईल त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

कामगारांच्या योजना असो किंवा त्यांना मिळणाऱ्या शासकीय सोयी सुविधा असो यापुढे त्याबाबत पाठपुरावा केला जाईल असे महेंद्र कोळी आणि सांगितले. या वेळी अनेक कामगारांचा विमा उतरविण्यात आला.

# अलिबागमध्ये डॉ. आनंद नाडकर्णी यांचे रविवारी व्याख्यान

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यासन एज्युकेशन फाउंडेशनतर्फे रविवारी (दि.२३) 'स्वभावाला औषध आहे' या विषयावर विख्यात मनोविकास तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अलिबाग येथील दत्ता खानविलकर एज्युकेशन ट्रस्टच्या चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या प्रांगणात संध्याकाळी ५.३० वाजता होणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

अलिबागमध्ये शैक्षणिक सजगता आणि पर्यावरण जागरूकतेसाठी विद्यासन एज्युकेशन फाउंडेशन कार्यरत असून संस्थेतर्फे विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. यात स्पीक इंग्लिश क्लासेस, आनंदी बालवाडी, पालकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा, युवकांसाठी करिअर गायडन्स शिबिर यांसारखे उपक्रम अलिबाग परिसरात चांगलेच लोकप्रिय ठरले आहेत. संस्थेच्या प्रकाशवाटा कॅरिअर गायडन्स आणि काउन्सिलिंग सेन्टरच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या करियर व सायकोलॉजिकल काउन्सिलिंगचा लाभ अलिबाग परिसरातील युवावर्गाला होत आहे. संस्थेतर्फे गेली दोन वर्षे आयपीएच ठाणे यांच्या सहयोगाने घेण्यात आलेली वेध संमेलने अलिबाग परिसरातील विद्यार्थ्यांसह सुजाण नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात कमालीची यशस्वी ठरली होती. सध्याच्या धकाधकीच्या, स्पर्धेच्या जीवनात आपल्या संपर्कातील व्यक्तींच्या स्वभावातील गुंतागुंतीला सामोरे जाणे आव्हानात्मक ठरत आहे. आणि म्हणूनच डॉ आनंद नाडकर्णी यांसारख्या विख्यात मनोविकास तज्ज्ञांकडून मानवी स्वभावांचे कंगोरे समजून घेणे, त्यातील गुणदोषांचे विश्लेषण करणे आणि एकंदरीत समाजस्वास्थ्यासाठी त्यातील दोषांचे निराकरण करणे यादृष्टीने 'स्वभावाला औषध आहे' या मुलाखतवजा कार्यक्रमाचे आयोजन विद्यासनतर्फे करण्यात आले आहे.

कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असला तरी उपस्थित राहण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. संस्थेच्या कार्यकर्त्या धनश्री: ७०३८७६८३३१ किंवा प्राची: ९९६०१६०४१९ यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी आणि या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# गागोदे शाळेतील विद्यार्थ्यांना सायकल व शिष्यवृत्तीचे वाटप



**पेण : प्रतिनिधी**

भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांच्या पुण्यतिथी निमित्त एसबीआय सन्मान अंतर्गत एसबीआय बँक आणि अनार्डे फाऊंडेशनच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा गागोदे (बुद्रुक) येथील विद्यार्थ्यांना सात सायकलीसह शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले आहे.

शाळेला यापूर्वीही अनेक सामाजिक उपक्रमातून मदत करत असताना यामध्ये सोलर पॅनल, वॉटर फ्युरी फायर, मैदानी खेळाचे साहित्य, १५ बँचेस, सुसज्य प्रयोग शाळा, शाळेचे सुशोभिकरण, स्मार्ट टीव्ही, वायफाय कनेक्शन आदी वस्तू देण्यात आल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली येलवे यांनी सांगितले.

या वेळी प्रयोग शाळेचे उद्घान एसबीआय व अनार्डे फाऊडेंशनचे अधिकारी देवाशिष चौधरी, सिध्देश हींगे यांच्या हस्ते करण्यात आले. तर सदर कार्यक्रमाला आचार्य विनोबा भावे आश्रमाचे विश्वस्त विजय दिवाण, मधुसूदन विचारे, बँकेच्या समिती सुकन्या बक्कम, सत्य शोधक संघटनेचे संदिप पाटील, शाळेचे केंद्र प्रमुख कोठेकर आदी उपस्थित होते.

# हेरिटेज आठवडा : जंजिरा किल्ल्यात निःशुल्क प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक हेरिटेज आठवडा असल्याने आजच्या दिवसात जेवढे पर्यटक जंजिरा किल्ला पहावयास येणार आहेत त्यांना निःशुल्क प्रवेश दिला जाणार आहे. सांस्कृतिक आणि नैसर्गिक हेरिटेजचे महत्त्व जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी सदरचा जागतिक हेरिटेज आठवडा पुरातत्व खात्यामार्फत दरवर्षी साजरा करण्यात येतो.

जागतिक हेरिटेज दिवसाचे महत्व हे आहे की तो आपल्याला आपल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक हेरिटेजचे महत्व जाणून घेण्यास आणि त्यांचे संरक्षण करण्यास प्रेरित करतो. हा दिवस आपल्याला आपल्या इतिहास, संस्कृती आणि परंपरेचे महत्व जाणून घेण्यास मदत करतो.



ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो. ज्या वास्तू ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक महत्व असते यांचे जतन करून येणाऱ्या भावी पिढीसाठी मार्गदर्शक भूमिका बजावत असणारे राजवाडे, इमारती व किल्ले यांचा समावेश होत असतो. आजचा दिवस खूप खास असल्याने पुरातत्व खात्यामार्फत पुरातन ऐतिहासिक किल्ले पर्यटक यांना पाहता यावे यासाठी आज निःशुल्क प्रवेश पर्यटक यांना देण्यात येत आहे. त्यामुळे पर्यटक यांच्या पैशाची बचत होणार आहे. दिवस भरात किल्ला पहाण्यासाठी पर्यटक मोठ्या संखेने हजर होते.

जंजिरा किल्ल्याचे बहू कार्य कर्मचारी प्रकाश घोगरे यांनी आमच्या प्रतिनिधीस सांगितले की, जागतिक हेरिटेज आठवडा निमित्ताने आज सर्व पर्यटक यांना मोफत प्रवेश देण्यात आला आहे. उद्देश एवढा आहे की,पुरातन वास्तू जपणे व त्याचा सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न पुरातत्व खात्यामार्फत केला जात आहे. आजचा दिवस खास असल्याने पर्यटक यांना निःशुल्क प्रवेश दिला आहे. पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# कौशल्य विकास प्रशिक्षण लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड व सीएसआर जेएनपीटी-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील कौशल्य विकास प्रशिक्षण देणारे साधन व्यक्ती, विद्यार्थी व कर्मचारी यांच्याकरिता सीएसआर जेएनपीटी मुंबई यांच्या आर्थिक सहकार्यातून १८ व १९ नोव्हेंबर २०२५ हे दोन दिवसीय कौशल्यवृध्दी व क्षमता बांधणी कार्यशाळा सुरू आहे.

या कार्यक्रमावेळी आत्मनिर्भर भारत साठी अशा प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे मत अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले तर जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, अशी सूचना उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर यांनी उपस्थिताना केली. जे.एस.एस रायगड व सीएसआर जेएनपीटी मुंबईमुळे व्होकल



फॉर लोकल संकल्पनेला प्रेरणा दिली जात असल्याचे मत संचालक डॉ विजय कोकणे यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले तसेच बोर्ड मेंबर नरेन जाधव ह्यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमावेळी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, बोर्ड मेंबर नरेन जाधव, अकाउंट मॅनेजर प्रतिक्षा चव्हाण, प्रशिक्षक सोनिया पाटील या मान्यवरांच्या व प्रशिक्षकांच्या उपस्थितीत सहभागी कर्मचारी लाभार्थी व प्रशिक्षकांना कार्यशाळा व प्रशिक्षण वर्गाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. ह्याच कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभावेळी आत्मनिर्भर भारत संकल्पनेला प्रेरणा दिली जात असल्याचे मत सीएसआर जेएनपीटी मुंबईचे मॅनेजर सयाजी साळुंके यांनी व्यक्त केले.

# देवा थापा ‘रोज मर्क केसरी’

## सोंडोली केसरी किताबाचा सतपाल सोनटक्के मानकरी



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सोंडोली (ता. शाहुवाडी) येथे नायकेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त घेण्यात आलेल्या कुस्ती दंगलमध्ये रोज मर्क केसरी किताबाचा मानकरी नेपाळचा देवा थापा ठरला, तर सोंडोली केसरीचा किताब सोलापूरच्या सतपाल सोनटक्के याने पटकावला. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध हर्षवर्धन सदगीर यांची कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली.

रोज मर्क केसरीसाठी अमित लाखाविरुद्ध सुरुवातीला शांत खेळणारा देवा थापा दहाव्या मिनिटाला आक्रमक झाला. डाव-प्रतिडाव सुरू झाले आणि हवेतच धोबी पाट मारत त्याने विजय मिळवला. या वेळी प्रेक्षकांनी मैदानात जल्लोष केला.

सतपाल सोनटक्के याने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत दहाव्या मिनिटाला समीर शेखवर ताबा मिळवला आणि पंधराव्या मिनिटाला पोकळ घिस्सा डावावर विजय मिळवत सोंडोली केसरीचा मानकरी ठरला.

महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांची कुस्ती तिसाव्या मिनिटाला बरोबरीत सोडवण्यात आली तसेच सोंडोलीच्या साहिल पाटील याने पुण्याच्या पै. धनाजी पाटीलवर शानदार विजय मिळवला. विजेत्यांना गौरविण्यात आले.

**थंडीतही प्रेक्षकांचा उत्साह कायम**

सायंकाळी सात वाजता प्रमुख कुस्त्यांना सुरुवात झाली. कडाक्याची थंडी असूनही नेपाळचा पैलवान देवा थापा याचे मैदानात प्रथम आगमन आणि आकर्षक लाइटिंगमुळे प्रेक्षकांचा उत्साह ताणला गेला. थापाची चुरशीची कुस्ती पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मैदानात उत्साहाने गर्दी केली होती.





# आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मैत्रेय मोकलला सुवर्णपदक

**उरण, पनवेल : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जसखार येथील मैत्रेय गणेश मोकल याने भूतानची राजधानी थिम्पू येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये ९३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले.

याआधी मैत्रेयने झारखंड टाटानगर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. या कामगिरीच्या आधारावर त्याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. मैत्रेयला शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत जगभरातून १५० स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातून एकूण ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये मैत्रेय याने उत्कृष्ट कामगिरी करीत सुवर्णपदक जिंकले. याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# अस्मिता खेलो इंडिया वूमन्स लीगमध्ये खेळाडूंचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



अस्मिता खेलो इंडिया वूमन्स लीग किकबॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आले होते. यामध्ये वि.बी. एसएस इंग्लिश मीडियम स्कूल, कोपरखैरणे येथे डॉ. मंदार पनवेलकर, किरण चव्हाण आणि मनीषा मिश्रा यांच्याकडे प्रशिक्षण घेते असलेल्या आठ विद्यार्थिनींनी चांगली कामगिरी केली.

स्पर्धेचे उद्घाटन पनवेल पालिकेचे सभागृह नेते आणि पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष परेश ठाकूर, वाको महाराष्ट्र किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष निलेश शेलार आणि पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेचे सचिव डॉ. मंदार पनवेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभासाठी माजी नगरसेवक समीर ठाकूर, ॲड. मनोज भुजबळ, दिलीप पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, मयुरेश नेतकर, दशरथ म्हात्रे, मयूर कदम आदी उपस्थित होते.

पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेच्या वतीने आणि कार्याध्यक्ष निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत एकूण ३४२ खेळाडूंनी सहभाग घेतला. हानाया तायडे, समीक्षा बडे, शरयू घुगे यांनी रौप्य, तर हंसिका गुरव, भव्या वाघमारे, त्रिशा जाधव, जान्हवी गुरव, आर्य शिंदे यांनी कांस्यपदक मिळवले. याशिवाय श्रीशा बरगे, प्रांजल माने, प्रियांशी मारी, दुर्वी दुबारिया यांनी सहभाग घेतला.

# डेरिल मिचेल वनडे क्रमवारीत अव्वल स्थानी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) च्या वनडे फलंदाजी क्रमवारीत पुन्हा एकदा मोठे फेरबदल झाले आहेत. टीम इंडियाचा स्टार फलंदाज आणि माजी कर्णधार रोहित शर्मा याच्याकडून नंबर एकचा मुकुट हिरावला गेला आहे. आता न्यूझीलंडच्या डेरिल मिचेल याने या सर्वोच्च स्थानावर पहिल्यांदाच कब्जा केला आहे.

वेस्ट इंडिजविरुद्ध नुकत्याच सुरू झालेल्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात मिचेलने शानदार शतक ठोकले. या खेळीच्या जोरावर त्याने थेट दोन स्थानांची झेप घेतली आणि थेट अव्वल स्थान गाठले. त्याचे रेटिंग वाढून ७८२ झाले. हे त्याच्या कारकिर्दीतील सर्वोच्च रेटिंग आहे.

या बदलामुळे रोहित शर्माला एका स्थानाचे नुकसान होऊन तो दुसऱ्या क्रमांकावर गेला आहे. हिटमॅनचे रेटिंग ७८१ आहे. नंबर एकचा फलंदाज मिचेल आणि रोहित यांच्या रेटिंगमध्ये केवळ एका अंकाचा फरक आहे.



## कूच बिहार क्रिकेट स्पर्धा

# महाराष्ट्राचा ओडिशावर दणदणीत विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

रिलायन्स नागोठणे येथील क्रिकेट स्टेडियमच्या मैदानावर खेळला गेलेल्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात यजमान महाराष्ट्राने ओडिशावर डाव व २५० धावांनी दणदणीत विजय मिळवला. महाराष्ट्राने निर्णायक विजय मिळवून बोनस पॉईंटची कमाई केली.

महाराष्ट्राच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ५२८ धावांचा डोंगर उभा केल्यानंतर फलंदाजीला आलेल्या ओडिशाचा संघ दोन्ही डावात ढेपाळला. पहिल्या डावात सर्व गडी बाद २०० धावसंख्या त्यामध्ये बिश्वजित प्रधान यांनी ४८ स्वागत मिश्रा ४२ पानाकला मोक्षीत यांनी ३७ धावांचे योगदान संघाला दिले. २०० धावसंखेवर संघाचा डाव संपला. महाराष्ट्राकडून अर्कम सय्यद याने सर्वाधिक पाच बळी घेतले, तर अभिनंदन अडकने तीन फलंदाजांना तंबूत धाडले. पहिल्या डावात महाराष्ट्राकडे ३२८ धावांची भक्कम आघाडी होती. ओडिशाचा संघ फॉलोऑन घेऊन पुन्हा फलंदाजीसाठी उतरला. ओडिशाचा दुसरा डाव अवघ्या २७.५ षटकात ७८ धावांत आटोपला. महाराष्ट्राच्या संमकित सुरानाने पाच, तर हर्षिल सावंतने चार फलंदाज बाद केले. महाराष्ट्राच्या संघाने या सामन्यात डाव व २५० धावांनी दणदणीत विजय मिळवून बोनस पॉईंटची कमाई केली.

महाराष्ट्राच्या संघाने उत्तम फलंदाजी व गोलंदाजी केल्याने संघाचे प्रशिक्षक इंद्रजीत कामतेकर, व्यवस्थापक राहुल अरवाडे, सिलेक्टर श्रीकांत काटे, शिरीष कामथे यांनी आनंद व्यक्त केला. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने सामना यशस्वी पूर्ण केल्याबद्दल रिलायन्स व सामना अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# पॅरा नॅशनल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये कोल्हापूरच्या रिया पाटीलचा दबदबा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हैदराबाद येथे झालेल्या २५व्या पॅरा नॅशनल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये कोल्हापूरच्या रिया पाटील हिने दमदार कामगिरी करत महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. रियाने या स्पर्धेत तीन सुवर्णपदके पटकावली तसेच तिला स्पर्धेतील ज्युनियर प्लेयर ऑफ द टुर्नामेंट हा मानाचा बहुमानही मिळाला.

रिया पाटीलने ड-५ ज्युनिअर कॅटेगरीमध्ये पहिल्या दिवशी १०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर त्याच दिवशी ५० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात सुवर्णपदक जिंकून पदकतालिकेत महाराष्ट्राचे खाते उघडले. दुसऱ्या दिवशीही तिने ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये आणखी एक सुवर्णपदक मिळवत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली.

यापूर्वीही रियाने गोवा २४ व्या नॅशनल चॅम्पियनशिप आणि गुवाहाटी येथील स्पर्धांमध्ये प्रत्येकी तीन सुवर्णपदके जिंकण्याची चमकदार कामगिरी केली आहे. कोल्हापूर पॅरा स्पोर्ट्स असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या रियाचे कौतुक होत आहे.

# गिल टीम इंडियासोबत गुवाहाटीला

## दुसऱ्या कसोटीत खेळण्यासंदर्भात संभ्रम कायम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा कसोटी सामना गुवाहटीच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. पहिल्या सामन्यात मानेला दुखापत झालेला कर्णधार शुबमन गिल वैद्यकीय उपचारांना शुभमन चांगला प्रतिसाद देत असून तो संघासोबत गुवाहाटीला रवाना झाला आहे.

बीसीसीआयने एक्स अकाउंटवरुन दिलेल्या माहितीनुसार, टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिल याला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कोलकाता कसोटीच्या दुसऱ्या दिवशी मानेला दुखापत झाली. दिवसभराचा खेळ संपल्यानंतर त्याला तत्काळ तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर त्याला मेडिकल टीमच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी डिस्चार्ज देण्यात आला. वैद्यकीय उपचारांना शुभमन चांगला प्रतिसाद देत आहे.

शुबमनच्या प्रकृतीवर बीसीसीआयची वैद्यकीय टीम सतत लक्ष ठेवणार आहे. दुसऱ्या कसोटीत तो खेळू शकेल की नाही याचा निर्णय परिस्थितीनुसार घेतला जाईल, असा उल्लेखही बीसीसीआयने ट्वीटमध्ये केला आहे. त्यामुळे शुबमन गिल संघासोबत गुवाहटीला गेला असला तरी दुसऱ्या कसोटी सामन्यात तो खेळणार की नाही या संदर्भातील संभ्रम मात्र कायम आहे. हा सामना २२ नोव्हेंबरपासून खेळला जाणार आहे.






# किकबॉक्सिंग स्पर्धेत समीक्षा कायंदेकरला सुवर्णपदक



**नवी मुंबई : बातमीदार**

अस्मिता खेलो इंडिया वूमन्स लीग किकबॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आले होते. यामध्ये डीएव्ही स्कूलच्या क्रीडा शिक्षिका समीक्षा कायंदेकर यांनी पॉईंट फाईट १९ वर्षापुढील व ५० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन पनवेल पालिकेचे सभागृह नेते आणि पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष परेश ठाकूर, वाको महाराष्ट्र किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष निलेश शेलार आणि पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेचे सचिव डॉ. मंदार पनवेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभासाठी माजी नगरसेवक समीर ठाकूर, ॲड. मनोज भुजबळ, दिलीप पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, मयुरेश नेतकर, दशरथ म्हात्रे, मयूर कदम आदी उपस्थित होते.

पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेच्या वतीने आणि कार्याध्यक्ष निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत पनवेल, रायगडसह नवी मुंबई, ठाणे, वसई, विरार, पालघर, पिंपरी चिंचवड, पुणे आदी ठिकाणहून एकूण ३४२ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

पनवेल शहर किकबॉक्सिंग संघटनेचे सचिव डॉ. मंदार पनवेलकर, स्मिता पनवेलकर, कार्याध्यक्ष भोसले, पियुष सदावर्ते, प्रतिक कारंडे यांच्या हस्ते समीक्षा कायंदेकर यांना गौरविण्यात आले.

# आरपीएलच्या पाचव्या हंगामाला उत्तम प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रायगड वॉरियर्स आयोजित रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी यांच्या सहकार्याने आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. पुरस्कृत रोटरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा नुकतीच मोठ्या उत्साहात झाली. स्पर्धेच्या या पाचव्या हंगामाला खेळाडू व दर्शकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

स्पर्धा पनवेल महापालिकेच्या वेंगसरकर अकॅडमी येथील मैदानावर रंगली. स्पर्धेतील प्लॅटिनम कप हा बाश्री ब्लास्टर या प्रशांतमामा यांच्या संघाने जिंकला. अतुल भगत हे संघाचे कर्णधार होते. या चषकासाठी अंतिम सामन्यात विद्यानंद बोंद्रे यांनी दमदार फलंदाजी करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. बीकेसी संघ उपविजेता ठरला.

सुवर्ण चषकासाठी प्राईम दादा इलेव्हन विरुद्ध पिंपरी इलियट अशी अंतिम लढत झाली, ज्यात प्राईम दादा संघाने विजय मिळविला गोल्ड कप पटकाविला. पिंपरी संघ उपविजेते ठरला. रौप्यचषक रेवल विनर्स संघाने जिंकला, तर आरआर फायटर्स उपविजेता ठरला.

स्पर्धेतील मालिकावीर सतिष देवकर, उत्कृष्ट फलंदाज पुष्कराज जोशी, उत्कृष्ट गोलंदाज नागभूषण रवीश, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रीतम कैया, गेमचेंजर रतन खरोल, उत्कृष्ट यष्टीरक्षक अभिषेक मोहिते यांनी स्पर्धेत छाप उमटवली.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. खेळीमेळीच्या वातावरणात सामने रंगले आणि सर्वांनी मनमुराद आनंद लुटला.

सौजन्य : हेमंत दांडेकर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com